चंद्रोदय

साने गुरुजी

चंद्रोदय

साने गुरुजी

राही प्रकाशन, अमळनेर

प्रकाशक :
श्री. वा. रा. सोनार
राही प्रकाशन
धुळे रोड, अमळनेर ४२५४०१.

आवृत्ती :
२६ ऑगस्ट १९९८

सर्वहक्क :
प्रकाशकाधीन

मुखपृष्ठ :
गोपाळ विसपुते

मुद्रणस्थळ :
श्री समर्थ साई मुद्रण
४२६, सोमवार पेठ, पुणे १.

मूल्य : रुपये २५ फक्त.

चंद्रोदय

पुष्कळवेळा आपले लक्ष दूरच्या मोठ्या व्यक्तींकडे असते. परंतु आपल्या जवळही मोठ्या गुणांची व उदाहरणे घेण्यासारखी आदर्श माणसे असतात, हे आपण विसरतो. मी मागे एकदा सांगितले होते की, या आपल्या दैनिकात शाळेतील शिक्षकांची सुद्धा कधी कधी माहिती देण्यात येईल. त्याप्रमाणे आज गुरुवर्य चंद्रोदय यांच्यासंबंधी जे मला माहीत आहे ते सांगणार आहे. चंद्रोदय भट्टाचार्य हे फार दूर पूर्व बंगाल्यात जन्मलेले आहेत. त्यांच्या गावाचे नाव कोमिला. हे एक जिल्ह्याचे ठिकाण आहे. बंगाल प्रदेशात कोमिला हे शहर राजकीय चळवळ व क्रांतिकारक चळवळ यासाठी प्रसिद्ध आहे. या शहरातून व या जिल्ह्यातून जितके लोक राजकारणात बळी पडले तितके कोठल्याही शहरातून किंवा जिल्ह्यातून पडले नाहीत. अशा या देशाभिमानाने भारलेल्या शहरात चंद्रोदय यांचा जन्म झाला. त्यांचे वडील तेथेच एका हायस्कूलमध्ये शिक्षक आहेत. ते फार उत्कृष्ट शिक्षक आहेत. परंतु हे ज्या हायस्कूलमध्ये शिक्षक आहेत, त्या हायस्कूलमध्ये त्यांची मुले शिकली नाहीत. कारण मुलांचा नंबर नेहमी पहिला असावयाचा. तेव्हा वडिलांनी मार्क्स दिले असे कोणी म्हणू नये.

चंद्रोदय हे उत्कृष्ट विद्यार्थी आहेत. त्यांचा पहिला नंबर कधीही गेला नाही. पहिल्या इयत्तेपासून ते इंटरमिजिएटपर्यंत ते

सतत पहिले आले. सर्व विषयांच्या शिक्षकांची त्यांच्यावर मर्जी असे. संस्कृतचे शिक्षक तर 'चंद्रोदय' जर उशिरा आले तर त्या वेळेपर्यंत अभ्यास सुरू करीत नसत. ड्रॉईंगमध्येसुद्धा त्यांनी बक्षिस पहिल्याच नंबरचे मिळविले होते. इंग्रजीत तर ते उत्कृष्ट तयार असत. त्यांनी लहानपणी कितीतरी इंग्रजी पुस्तके वाचली व सर्व शब्द डिक्शनरीतून काढून चांगले चांगले इंग्रजी उतारे ते पाठ करीत. टॉडचे मॅन्युअल त्यांनी सर्व पाठ केले होते व याचा त्यांना फार चांगला उपयोग झाला. मॅट्रिकच्या परीक्षेच्या वेळी Memory वर त्यांना निबंध लिहावयास आला. त्यांनी Memory यावरील धडा पाठ केलाच होता. मग काय उडवून दिला नुसता निबंध! अमुक एक विषय कच्चा असे त्यांस माहीत नसे. त्यांचा भूगोल हा विषय कच्चा असे. एकदा पाचव्या इयत्तेच्या सहामाहीत त्यांचा दुसरा नंबर आला. कारण भूगोलात त्यांस फार कमी मार्क मिळाले. ज्याचा नंबर पहिला आला, त्याला भूगोलात मार्क चंद्रोदयपेक्षा जास्त होते. चंद्रोदय हे नुसता मनात मनोरथ करून राहणारे लहानपणापासून नाहीत. त्यांनी भूगोलाचा खूप अभ्यास केला व वार्षिक परीक्षेत पुन्हा पहिले आले. त्या दुसऱ्या मुलास भूगोलात चंद्रोदयपेक्षा फक्त चार मार्क जास्त मिळाले होते! हायस्कूलमध्ये असेपर्यंत चंद्रोदय पत्त्यांच्या खेळाला कधी शिवले नाहीत! फूटबॉल व हॉकी हे खेळ त्यांना आवडत. त्यांना प्रत्येक वर्गात बक्षिसे व स्कॉलरशिप मिळत होती. मॅट्रिकच्या परीक्षेत त्यांच्या जिल्ह्यात ते प्रथम आले. गणितात त्यांना २०० पैकी १९९ मार्क मिळाले! म्हणजे एकच मार्क कमी. किती काळजीपूर्वक ते अभ्यास करीत असतील ते पाहा. त्यांना बुद्धी तर अलौकिक आहेच पण प्रयत्नही त्यांच्याजवळ दांडगा आहे.

कॉलेजमध्ये प्रिव्हियसमध्ये पुन्हा ते पहिले आले. ते पहिले स्कॉलर होते. इंटरमिजीएटमध्ये ते गेले. वार्षिक परीक्षेचे दिवस जवळ आले होते. परंतु इतक्यात असहकारितेची चळवळ आली. मुलांना शाळा व कॉलेजे सोडण्यास गांधीजी, देशबंधू दास वगैरे सांगू लागले. देशबंधू दास यांचे कोमिला येथे व्याख्यान झाले

व चंद्रोदय यांनी कॉलेजला कायमचा रामराम ठोकला. ते त्यांच्या कॉलेजमध्ये पहिले स्कॉलर होते. त्यांच्या खालची मुले आता निरनिराळ्या कॉलेजमध्ये प्रोफेसर आहेत. कदाचित त्यांना मोठी शिष्यवृत्ती मिळून ते इंग्लंडला वगैरे गेले असते. परंतु या भावी भाग्यावर देशभक्तीमुळे त्यांनी आनंदाने पाणी सोडले. केवढा हा स्वार्थत्याग. नंतर घरातून एक चादर व काही कपडे घेऊन ते आपल्या इतर मंडळींना मिळाले. त्या मंडळींनी एक आश्रम काढला. त्यावेळेस रोज ४ वाजता ते उठत. स्वयंपाक वगैरे हातानेच करावयाचा. धड पांघरावयास नसावयाचे. अशा या वेळेस चंद्रोदय यांस थोडा फार दम्याचा विकार जडला व तो अद्यापही कायम आहे. म्हणून त्यांना थंडीत प्रकृतीस फार जपावे लागते. अमळनेरला तर फारच.

ते सूत कातावयास व विणावयास शिकले. यांच्या मंडळीने कोमिला येथे 'अभयाश्रम' नावाचा आश्रम काढला. या आश्रमात प्रफुल्लचंद्र घोषसारखी मोठमोठी माणसे आहेत. प्रफुल्लचंद्र घोष हे टांकसाळीच्या खात्यात ७५० रुपये पगारावर होते. त्यांनी ही नोकरी सोडली व अभयाश्रमात मोफत औषधे वगैरे देण्याचे काम सुरू केले. अभयाश्रमातील लोकांनी एक शाळा चालविली. यात १५० एक मुले होती. यात पुष्कळशी मुसलमान मुले होती. शाळेत फी नसे. चंद्रोदय या शाळेचे केवळ जीव होते. त्यांनी या शाळेसाठी पुष्कळ खटपट केली.

परंतु तेथे चंद्रोदयांचे ज्ञानेच्छू मन तृप्त होईना. त्यांचा मोठा भाऊ हा तत्त्वज्ञान मंदिरात फेलो म्हणून आला होता. त्यांच्या मोठ्या भावावर गुप्त पोलिसांचा १९१४-१६ च्या सुमारास दात असे. त्यावेळी ते ब्रह्मदेशांत वगैरे गुप्तपणे नावे बदलून राहिले. परंतु पुढे त्यांचा हा ससेमिरा सुटला व ते M. A. पहिल्या वर्गात पास झाले. ते फार हुशार होते. इंग्रजी उत्तम बोलत. त्यांनी चंद्रोदय यांस येथे तत्त्वज्ञानावर अभ्यास करतो का म्हणून विचारले. चंद्रोदय आनंदाने आले. या रीतीने त्यांचा व दूरच्या या अमळनेरचा संबंध आला. तत्त्वज्ञान मंदिरात त्यांनी पाश्चात्य

तत्त्वज्ञान, नीतीशास्त्र, मानसशास्त्र, धर्मशास्त्र व पौर्वात्य तत्त्वज्ञान यांचा नीट अभ्यास केला. कोणतीही गोष्ट पूर्णपणे करावयाची हा त्यांचा स्वभाव होता. ते येथे राहिले. परंतु ते एम. ए. नसल्यामुळे त्यांस फेलो म्हणून येथे घेतले नाही. त्यांचा भाऊपण आधीच कलकत्त्यास निघून गेला होता.

शेवटी हरीभाऊ यांनी चंद्रोदयांस आपल्या शाळेत येण्याची विनंती केली. ते आले व आपल्या शाळेत आज दोन वर्षे आहेत. त्यांनी येथे मराठीचा अभ्यास केला. पहिली चार मराठी क्रमिक पुस्तके त्यांनी शब्दश: मजजवळ व दुसऱ्या एका गृहस्थांजवळ वाचली. तुकारामाचे अभंग वगैरे काही वाचले. मराठी व्याकरण कठीण असल्यामुळे त्यांस अगदी शुद्ध बोलता येत नाही. तरी त्यांस सर्व समजते व ते बोलतातही.

शिक्षक झाल्यावर उत्कृष्ट शिक्षक व्हावे हे त्यांना वेड लागले. शिक्षणशास्त्राचा अभ्यास त्यांनी गेल्या वर्षापासून सुरू केला. शिक्षणशास्त्रावरचे पुष्कळसे ग्रंथ, इंग्रजी कसे शिकवावे वगैरे त्यांनी आत्मसात केले. नवीन ऑक्सफर्ड डिक्शनरीतील उच्चार हे अन्य असल्यामुळे आपले सर्व उच्चार ते हल्ली त्या डिक्शनरीतून पाठ करतात. नाहीतर मी जे जुने उच्चार शिकलो तेच मी अजूनही चालवितो व कधी ऑक्सफर्ड डिक्शनरी पाहत नाही.

गणित विषय हा तर चंद्रोदयांचा हातचा मळ. परंतु Something of everything and master of onething हे त्यांचे ध्येय आहे. गणितात प्रवीण ते आहेतच. इंग्रजीही ते उत्कृष्ट लिहितात, बोलतात व शिकवितात. संस्कृतही त्यांचे चांगले आहे. सिद्धांत कौमुदीतील सूत्रे व Apte's guide मधील वाक्ये त्यांना अजून पाठ येतात.

चंद्रोदयांचा स्वभाव असा आहे की अष्टपैलू व्हावे असे त्यांस वाटते. शिक्षणशास्त्रातील S. T. C. ही पदवी त्यांनी घेतलीच परंतु त्याशिवाय इतर गोष्टींचाही त्यांना नाद आहे. आपल्या शाळेत मुळे, कोलारकर वगैरे गायनपटू लोक आहेत. आपल्यास जरी गाता आले नाही तरी गाण्यातील राग-रागिण्यांची, तालांची, मात्रांची माहिती असावी. एक प्रकारचे गाण्याचे Scientific

ग्रंथ वाचनालय सातारा.
बाल विभाग

appreciation करता यावे म्हणून चंद्रोदय मुळे मास्तरांजवळ गाणे शिकू लागले. जठार व चंद्रोदय यांनी मुळे मास्तरांची शिकवणी ठेवली. चंद्रोदयांना मिळणार ४०/५० रुपये, परंतु त्यांस कला शिकण्यासाठी ते शिकवणी ठेवण्यास तयार झाले. याला म्हणतात खरी ज्ञानपिपासा. त्याचप्रमाणे येथे देसाई मास्तर होते, त्यांच्या जवळ थोडी थोडी सतार वाजवावयासही ते शिकले. छात्रालयाची मोडकी सतार गोखले सरांकडे होती. त्यांनी ती सोनूकडून दुरुस्त करवून घेऊन थोडीथोडी प्रॅक्टिससाठी वाजवण्यास तयार केली. एकटे खोलीत बसून ते मुळे मास्तरांनी शिकविलेले गाणे गात बसतात. मुळे मास्तरांचे भाऊ हे तबला वाजवतात. कोलारकरांचा तबला आपल्या खोलीत नेऊन चंद्रोदय मुळे मास्तरांचे बंधू आले की त्यांच्या जवळ तबल्याचे बोल शिकत व त्याचा अभ्यास करीत. त्यांनी सतारशिक्षक, रागरत्नाकर वगैरे पुस्तके मागवून घेतली. केवढा हा नाद! यांचेपेक्षाही आणखी उद्योगीपणाची गोष्ट सांगू? चंद्रोदय यांचे हस्ताक्षर जरा चांगले नाही. आपले हस्ताक्षर सुधारावे म्हणून ते प्रयत्न करू लागले. सात-आठ कॉपी पुस्तके त्यांनी गिरविली. रफ कॉपी बुके लिहिली. बागूल, सराफ यांना त्यांनी विचारावे, टाक कसा धरावा, तिरपा धरावा, उपडा धरावा, का अगदी उभा धरावा? त्याच्यावरच त्यांची चर्चा व्हावी. अशा रीतीने अक्षर सुधारण्यासाठी एक शिक्षक खटपट करतो. परंतु मुलांना जर सांगितले की तुम्ही आपले अक्षर सुधारा तर ते कितपत लक्ष देतात? आपल्यामध्ये गुण यावेत ही इच्छाच मुळी नसते!

चंद्रोदय हे चांगला स्वयंपाकही करतात. मी त्यांना यात बरीच मदत करीत असे. छात्रालयाचे जेवण त्यांना सोसत नसे म्हणून गेल्या वर्षी मे महिन्यात जाईपर्यंत ४, ५ महिने त्यांनी हातानेच स्वयंपाक केला. याला म्हणतात निश्चय!

चंद्रोदयांनी पुष्कळ वाचले आहे. इतिहास, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान, भाषाशास्त्र, वैद्यक यावर त्यांनी वाचले आहे. त्यांच्या अभयाश्रमात मोठमोठे डॉक्टर होते, त्यांच्या हाताखाली राहून चंद्रोदय यास

वैद्यकाचीही बरीच माहिती झालेली आहे.

लहानपणी त्यांना सुंदर बंगाली लिहिता येत असे. इंग्रजी पाचवीत असताना त्यांचे एक मित्र व ते एक पुस्तक लिहिणार होते. त्याची प्रस्तावना चंद्रोदय यांनी लिहिली होती व आईस वाचून दाखविली होती! चंद्रोदयांची आई अत्यंत प्रेमळ आहे व चंद्रोदयांच्यावर तिचा फार जीव. चंद्रोदयांचे घरचे दुसरे नाव 'मना' असे आहे. चंद्रोदयांच्या आईला दम्याची व्यथा आहे. चंद्रोदयांनी तिची पुष्कळ शुश्रूषा केलेली आहे. चंद्रोदय हे आईची शुश्रूषा चांगली ठेवतात. मागे इन्फ्लुएंझाच्या वेळेस चंद्रोदयांच्या घरात सर्व आजारी होते. फक्त त्यांची आई व ते बरे होते. त्या दोघांनीच सर्वांची शुश्रूषा केली. चंद्रोदयांच्या आईलाच सर्व व्यवस्था ठेवावी लागते. वडील देवमाणूस आहेत. त्यांनी शाळेत शिकवावे फक्त; बाजारहाट वगैरे त्यांस समजत नाही. ते अत्यंत देवभोळे आहेत. चंद्रोदय आजारी पडले त्याला कारण म्हणजे त्यांच्या वडिलांचा थोर स्वभाव. चंद्रोदयांच्या मूळच्या गावातील एक गरीब बाई आपल्या मुलास घेऊन चंद्रोदयांच्या घरी आली. त्या मुलास तो दोषी ताप येत असे. तो रक्त ओकत असे. डॉक्टरांनी सांगितले की, याला घरात ठेवू नका. परंतु चंद्रोदयांचे वडील त्या अनाथ मुलास कोठे पाठवणार? त्यांनी त्याला घरी ठेवले. चंद्रोदयांच्या बहिणीचा मुलगा मग त्याच रोगाने आजारी पडला, चंद्रोदयही पडले. परंतु सर्व बरे झाले. चंद्रोदयांचे वडील रोज देवाची प्रार्थना करीत, त्याचा हा परिणाम असे चंद्रोदय लिहितात.

चंद्रोदयांच्या घरी लहानपणी किती तरी मोफत विद्यार्थी शिकण्यासाठी ठेवलेले असत. चंद्रोदयांची आजी अजून आहे. ती सर्वांना सकाळी दूध प्यावयास वाटीतून द्यावयाची. बंगालमध्ये म्हशीचे दूध पीत नाहीत. तिकडे गायी पुष्कळ आहेत. गायी असतात व त्यांचे दूध प्यावयाचे.

लहानपणी चंद्रोदय खोडकर असत. शेजारचा एक मुलगा म्हणाला, "तू किती मारलेस तरी मी रडणार नाही!" चंद्रोदय

नगर वाचनालय सातारा
बाल विभाग

यांनी त्यास खूप तडाखे दिले! एक दिवस घरात आंब्याची पोळी होती. ती वाटोळी होती. तिच्या सर्व बाजूंनी ते कुरतडून खात व पुन्हा वाटोळी करून ठेवीत. पण लहान वर्तुळ होते, इकडे लक्ष नसे. चंद्रोदयांना प्रथम संध्या येत नसे. चंद्रोदयांचे एक लहान चुलते घरी आले होते. चंद्रोदयांनी पाहिले की आपल्या चुलत्यास संध्या येत नाही. चंद्रोदयांचे वडील धर्मनिष्ठ! चंद्रोदयांनी चुलत्याची फजिती करण्यासाठी आधी स्वत: संध्या पाठ केली व मग वडिलांना म्हणाले, ''धाकट्या काकांना संध्या येत नाही!'' वडील म्हणाले, ''तुला तरी येते का?'' ''हो, मी उगीच बरे सांगेन.'' चंद्रोदयांनी म्हणून दाखविली. चंद्रोदयांच्या वडिलांनी आपल्या धाकट्या भावास आधी संध्या पाठ करण्यास सांगितले.

चंद्रोदय येथे असले म्हणजे संध्या वगैरे करीत नाहीत. पण माझ्याजवळ म्हणतात, ''जर मी येथे नियमाने संध्या करतो असे आईला कळविले तर तिला किती आनंद होईल.'' एखादी चांगली वस्तू पाहिली म्हणजे आईला द्यावी असे त्यांच्या मनात येते! त्यांचे आई-वडिलांवर फार प्रेम व भक्ती आहे. ते म्हणतात, ''मी कधी आजारी पडू नये कारण माझ्या आईबाबांना फार दु:ख होईल. मी त्यांच्या आधी मरू नये कारण त्यांना वाईट वाटेल. मला सर्वात दु:ख जर कशाने होईल तर माझ्या आईबाबांच्या मरणाने.''

चंद्रोदयांस दोन लहान भाऊ आहेत व दोन बहिणी आहेत. बहिणींची लग्ने झालेली आहेत. चंद्रोदयांचे लहान भाऊ फार हुशार आहेत. एक भाऊ तर प्रकृतीने सशक्त व चंद्रोदयांहून बराच उंच आहे. तो त्यांस घरी चिडवितो. त्यांचा एक भाऊ आता कॉलेजमध्ये गेला व एक सातवीत असेल. डिक्शनरीतील कठीण शब्द चंद्रोदयांजवळ शब्दांच्या भेंड्या लावण्यासाठी ते पाठ करतात व X चे Z चे शब्द ते पाठ करून चंद्रोदय त्यास अडवतात. त्यांच्या सारखेच त्यांचे भाऊ! असे चंद्रोदय आहेत. ते आपल्या शाळेस मिळाले हे भाग्य आहे. ते लवकरच आपल्यात येवोत.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

अनंताची गोष्ट

भुसावळ येथील रेल्वेच्या कारखान्यात वासुदेवराव हे नोकरीस होते. ते राहणारे कोकणातील. त्यांचे घराणे श्रीमंत व खानदानीचे होते. त्यांच्या घराण्यात श्रीमंती व विद्वत्ता या दोन्ही परंपरा आल्या होत्या. वासुदेवरावांच्या घराण्यात कोणी प्रोफेसर होऊन गेले होते तर कोणी मामलेदार, मुन्सफ झालेले होते. वासुदेवराव फारसे शिकले सवरले नाहीत. मॅट्रिक पावेतो ते जेमतेम शिकले व रेल्वेत त्यांनी नोकरी धरली. त्यावेळेस रेल्वेत नोकरी मिळणे फार कठीण नव्हते. वासुदेवराव यांस सहज नोकरी मिळाली.

वासुदेवराव यांचे लग्न देशावरील एका मुलीशी घडून आले. प्रथम जेव्हा वासुदेवराव यांनी आपले कुटुंब कोकणात नेले तेव्हा त्यांची फार फजिती होई. कारण कोकणातील विशिष्ट शब्दांचा वापर! कोकणातून पावसाळ्याच्या आधी रोप तयार करण्यासाठी जमीन तिच्यावर राब वगैरे घालून भाजावी लागते. सकाळच्या वेळी शेतांना अशी जी आग लावतात त्याला 'दाढींना आग लागली' असे म्हणतात. जे शेत भाजून काढावयाचे असते त्याला तरवा किंवा दाढ असे म्हणतात. पार्वतीकाकू जेव्हा खानदेशातून वासुदेवरावांबरोबर कोकणात गेल्या, तेव्हा दाढीला तिकडे आग लागली आहे, असे त्यांच्या जाऊबाईंनी म्हटलेलं ऐकताच त्या

नगर वाचनालय सातारा.
बाळ विभाग

एकदम बंगल्यात घागर घेऊन धावल्या! त्यांना वाटले, पुरुषांच्या दाढीस आग लागली असावी! वैश्वदेव करावयाच्या वेळी मामंजींनी पार्वतीकाकूस सांगितले, ''पार्वती, परसावातून थाबडा घेऊन ये.'' कोकणात शेण्या ज्या वाळलेल्या असतात, त्याला थाबडा म्हणतात. पार्वतीकाकू सर्वत्र हिंडल्या व सांगत आल्या, ''मला थाबडा सापडत नाही.'' रागीट मामंजी एकदम उसळून म्हणाले, ''का आंधळी आहेस, अग ते पाहा तेथे किती थाबडे आहेत.'' शेवटी जाऊबाईंनी थाबडा नेऊन दिला. पार्वतीकाकू म्हणत, ''तुमच्या कोकणाची बोली म्हणजे अघटितच आहे. बाई चांगले शेणी म्हणायचे सोडून थाबडा म्हणे म्हणा!'' तरी पण सवयीने पार्वतीकाकू नीट वागू लागल्या. त्यांचा स्वभाव आनंदी होता. त्यांना थोडेच काही कोकणस्थांसारखे राहावयाचे होते?

वासुदेवराव पुन्हा आपल्या रोजगारावर गेले व पार्वतीकाकूपण पतीबरोबर गेल्या. वासुदेवराव पुढे भाऊबंदांपासून वेगळे झाले. घरात भांडणतंटे झाले. त्यांच्या वाटणीस घराचा काही हिस्सा व दोन-तीन खंडी मक्याचे शेतभात व परसावही आली होती. वासुदेवराव स्वत: आता कोकणात फारसे जात नसत. त्यांनी आपले शेतभात एका विश्वासू आप्ताच्या स्वाधीन केले होते.

वासुदेवराव फार उंच नव्हते. तरीपण अंगाने स्थूल असल्यामुळे दिसावयास तरुणपणात रुबाबदार दिसत. पार्वतीकाकूंचा वर्ण काळासावळाच होता; वासुदेवराव गोरेपान होते. वासुदेवरावांच्या घराण्यात बहुतेकांचा रंग गोरा होता. या बाबतीत पार्वतीकाकूच कमी गोऱ्या होत्या. त्या मोठ्या दक्ष व व्यवहारी होत्या. काटकसर कशी करावी हे त्यांना शिकवावे लागत नसे. गृहकारभारात त्या चतुर होत्या.

वासुदेवराव यांस पहिला वहिला मुलगा झाला. तेव्हा कोण आनंद झाला? त्यांनी कोकणात पंचवीस रुपये आपल्या आप्तस्वकीयांकडे पाठवले व देवावर अभिषेक करण्यास, गावात पेढे वाटण्यास सांगितले. पुत्रजन्म म्हणजे केवढा आनंदाचा प्रसंग

हे आई-बापासच माहीत. परंतु या जगात सुख व दुःख ही अगदी शेजारी शेजारी राहतात. काट्यावरती गुलाब असतो. गुलाबाजवळ काटे असतात. दिव्याखाली अंधार असतो. पार्वतीकाकू लहानग्या मुलाचे कोडकौतुक करीत होत्या. त्याला बिंदी केल्या, लहानसा ताईत केला. परंतु तो लहान मुलगा आजारी पडला. वासुदेवराव यांना रात्रीची ड्यूटी त्याच आठवड्यात आली. रात्रीच्या वेळी पार्वतीबाई मुलाच्या उशाशी बसून राहत. त्याला मांडीवर घेऊन चारी प्रहर बसत. त्याला पाळण्यात घालून अक्षयी आंदुळीत. परंतु त्यांचे हे प्रयत्न यशस्वी झाले नाहीत. देवाने दिलेला बाळ परत नेला. पहिला मुलगा जेव्हा जातो तेव्हा त्या मातेस जे दुःख होत असेल ते कोण वर्णील? नऊ महिने ज्याला पोटात वाढवला, प्रसुतीच्या वेदना सहन केल्या व जे गोजिरवाणे बाळ डोळ्यांनी पाहिले, ज्याला अंगाखांद्यावर खेळवले, मांडीवर घेतले, ज्याला हसवले, ज्याचे मुके घेतले, संसारातील पहिला आनंद, पतीपत्नीचे प्रेम दृढ करणारा दुवा असा तो बाळ काळाने नेणे केवढे सृष्टीचे हे क्रौर्य!

पार्वतीबाईंवर हा पहिलाच प्रसंग! वासुदेवराव हे तर पुरुषासारखे पुरुष परंतु त्यांचेही अवसान गळाले. ऑफिसात जात परंतु मध्येच त्यांच्या डोळ्यांत अश्रू येत. कामाकडे त्यांचे लक्ष नसे.

परंतु हेही दिवस गेले. दिवसापाठीमागून दिवस जात असतात. काळ कोणाच्या सुखासाठी वा दुःखासाठी राहत नाही. पहिल्या पुत्राचे दुःख कमी झाले. पार्वतीकाकूंना काही दिवसांनी दुसरे अपत्य झाले. परंतु हेही अपत्य पार्वतीबाईंना लाभले नाही. एकापाठीमागून एक पार्वतीबाईंची चार सोन्यासारखी मुले गेली. पार्वतीबाईंचे हृदय करपून जात होते. देवाने द्यावी तरी कशाला मुले! एका हाताने देतो व दुसऱ्या हाताने हिसकावून घेतो इतका हा देव कठोर का आहे? आलेल्या या दुःखभारांनी वासुदेवराव व पार्वतीबाई हताश झाली. संसारात त्यांना रस वाटेना. भगभगीत उजाड, ओस असे त्यांना वाटे. रडावयास आता अश्रूसुद्धा राहिले नाहीत.

नवीन मूल झाले की हे जाणार असे ठरलेलेच.

पार्वतीबाईंना पुन्हा एक पुत्र झाला. या मुलाचे नावसुद्धा बारावे दिवशी त्यांनी ठेवले नाही. मुलगा वर्षाचा झाला. तर मग कोकणात जाऊ, अंबादेवीच्या चरणावर त्याला घालू व मग त्याचे नाव ठेवू असे पतीपत्नींनी ठरविले.

नगर वाचनालय सातारा
बाल विभाग

पार्वतीकाकू आता पोक्त झाल्या होत्या. संकटांनी मनुष्यास अकाली पोक्तपणा व वृद्धत्व येत असते. नवीन झालेला मुलगा वाढू लागला. मुलगा मोठा गोड होता. दिसावयास सुंदर होता. त्याचे नाक तरतरीत व सरळ होते. डोळे काळेभोर होते, डोक्यावरचे विपुल केस त्याला शोभून दिसत होते. कळीमधून फूल डोकवावे, काळ्या ढगांमधून चंद्र दिसावा, काळ्या लहरींमधून शुभ्र फेस चमकावा त्याप्रमाणे त्या केसांमधून त्याचे गोरेपान तोंड चमके. मुलगा जसजसा मोठा होऊ लागला, तसतसे पार्वतीकाकूंचे हृदय अधीर व अस्वस्थ होऊ लागले. देवकीमातेला कंस केव्हा येईल असे जसे वाटे, त्याप्रमाणे आपला हा सुकुमार राजस बाळ नेण्यासाठी काळ केव्हा येईल, असे पार्वतीकाकूंस सतत वाटत राही. मुलास जरा पडसे झाले किंवा अंग जरा फणफणले की लगेच पार्वतीकाकूंच्या हृदयाचे पाणी होई व डोळ्यांमधून गंगायमुना वाहत. मुलाला रोज शंकराच्या देवळातील अंगारा आणून लावीत, सायंकाळ झाली की पार्वतीकाकू त्याच्यावरून मीठ मोहऱ्या ओवाळून चुलीत टाकीत व घाण सुटली व मीठमोहऱ्या जर चुलीत तडतडल्या तर म्हणत, ''बाळावर खरेच दृष्ट पडली होती हो.'' दृष्ट काढताना, 'इडा पीडा टळो बाळ माझा सुखी राहो' किंवा 'झाडामाडाची, भुताखेताची, पाटचा चांडाळाची पडलेली दृष्ट चुलीत जावो, करपट होवो' असे म्हणावयाच्या.

वासुदेवराव रात्री ड्यूटीवर असले म्हणजे राम राम म्हणत व 'शिरो मे राघवः पातु' वगैरे चरण म्हणताना आपल्या मुलाच्या शिराला हात लावीत. 'भालं दशरथात्मजः' असे म्हणताना मुलाच्या भालप्रदेशाला कपाळाला हात लावीत. अशा रीतीने रामचंद्र जणू

नगर वाचनालय सातारा
[illegible]

मुलाच्या सर्व शरीराचे संरक्षण करीत आहेत, या भावनेने तन्मय होत.

देव नवसास पावला ना? दु:खाने होरपळून गेलेल्या या दोन जिवांच्या संसारात वसंत ऋतू परमेश्वर आणणार का? त्यांना हा पुत्र लाभणार का? पार्वतीबाईंची इतर बाळे ज्या वयाची होऊन गेली, त्या वयापेक्षा हा मुलगा मोठा झाला. हा पुत्र वाचणार असे आई-बापास वाटू लागले. एक एक दिवस मुलाला वाढताना पाहून पार्वतीकाकूंच्या अंत:करणातील आशांकूर पण वाढे. मुलगा वाढत होता व मातापित्यांचा आनंदही वर्धमान करीत होता.

मुलगा वर्षाचा होत आला. त्याला कोकणात नेऊन देवीच्या पायावर घालावयाचे त्यांनी ठरविले होते. वासुदेवरावांनी दहा दिवसांची रजा घेतली व उभयतां कोकणात जाण्यासाठी निघाली. मुंबईस येऊन बोटीत बसली. मुलाला चांगले गरम कपडे केले होते. समुद्राचा वाराबिरा बाधावयाचा एखादा!

वासुदेवराव पुष्कळ वर्षांनी कोकणात जात होते. अनंत दर्या त्यांनी कधी खानदेशात पाहिला नाही. तो कोकणाचा सखा सागर पाहून त्यांचे हृदय उचंबळून आले. दूर किनाऱ्यावर दिसणारी नारळी-पोफळीची झाडे त्यांचे डोळयांस गोठून घेत होती. वासुदेवरावांचे बंदर आले. सर्व जपून उतरली व गाडीतून आपल्या जन्मगावी वासुदेवराव आले.

वासुदेवरावांच्या घरी आज कोण मोठी गर्दी. पुष्कळ वर्षांनी ते परत आले होते. त्यांच्या समाचाराला त्यांच्या बरोबरचे गावकरी येत होते. पार्वतीकाकूंना त्यांच्या जावा वगैरे भेटल्या. सुखदु:खाच्या अनेक गोष्टी झाल्या. पार्वतीबाईंचा गोजिरवाणा मुलगा पाहून सर्वांच्या डोळयांचे समाधान होई.

"उद्या मंगळवार आहे तर देवीस जायचे ना?" पार्वतीबाईंनी पतीस विचारले. वासुदेवराव म्हणाले, "हो, पायांनीच सर्व जाऊ. उद्या लवकर सर्व उठू. बाळाला न्हाऊ माखू घाल बरे का आणि सूर्य वर नाही आला तो निघू."

त्याप्रमाणे ठरले. फुले वगैरे जमवून ठेवली. देवीची ओटी भरण्यासाठी पाच रुपयांचा खण आणला होता. तो ताम्हनात ठेवला. करा घेतला, सुपारी वगैरे सर्व घेतले. कुंकवाची चांदीची सुंदर कुईरी घेतली. लहानग्या वर्षभराच्या बाळाला न्हाऊमाखू घातले. अंगाला नीट तेल, दूध, हळद लावले. पायांवर आंघोळ घालताना काय हसायचा म्हणून सांगू. गुलामाला पाणी अंगावर जितके घालाल तितके आपले आवडायचे. त्याचे अंग नीट पुसलें. डोळ्यांना काजळ, कपाळाला तीट लावली व गालावर दृष्ट पडू नये म्हणून गालबोट लावले. चंद्र जसा कलंकाने रमणीय दिसतो, कमळावर भ्रमर बसल्याने जसे ते जास्तच सुंदर दिसते, त्याप्रमाणे बाळाचे तोंड खुलू लागले. त्याला दोन चिमणे दात आले होते. ते कसे मोत्यासारखे दिसत; डाळींबाच्या दाण्याप्रमाणे गोड व नाजूक दिसत. त्याला सुंदर झबले घातले. त्याला हासोळी ताईत घातला. करांगुळीत लहानशी घागऱ्या लावलेली अंगठी घातली. तो बाळ इतका सुंदर दिसू लागला की त्याच्या आईचीच त्याच्यावर दृष्ट पडली असती. मुलाला समजत नसते, पण आईच स्वतःच्या सुखासाठी मुलाला नटवीत असते. ताईत काय, अंगठी काय याची कल्पना लहान बाळाला काय असणार? आपल्या मुलाला आपल्या आवडीनुसार आई सजवते व बाळ कसा छान दिसतो असे म्हणते.

नगर वाचनालय सातारा
बाळ विभाग

पार्वतीबाईंनी पुढे मोत्यांचे पिंपळपान लावलेली सुरेख कुंची मुलाच्या डोक्यावर घातली. पायात लोकरीचे विणलेले गुलाबी मोजे घातले. पार्वतीबाईंच्या जावा वगैरे व इतरही काही शेजारणी गावाबाहेर देवीचे देऊळ होते तिथे निघाल्या. वासुदेवरावही बरोबर होते. गडी गोविंदा तो बरोबर डोक्यावर ओटीचे सामान टोपलीत घेऊन चालला होता.

नदीकाठी देवीचे देऊळ होते. या देवीच्या देवळाजवळ सुंदर विहीर बांधलेली होती, ती वासुदेवरावांच्या घराण्यातील पूर्वजांनी बांधली होती व तेथे एक शेत होते, ते देवीला दिलेले होते.

म्हणून त्याला देवशेत म्हणत. नदीला सुंदर धरणही वासुदेवरावांच्या पूर्वजांनी बांधले होते.

अशा त्या पूर्वस्मृतीला परिचयाचे असे देवीचे देऊळ आले. नदीतून पलीकडे जाताना वाकून डोळ्यांना पाणी सर्वांनी लावले. आले देऊळ! देवळाच्या सभोवार गर्द झाडी होती. प्रात:काळची वेळ होती व पाखरांची किलबिल चालली होती. बकुळीची टपोरी मोत्यांसारखी फुले, त्याची पिखरण पडली होती व वासाचा घमघमाट सुटला होता. देवळात पुजारी नुकताच आला होता व तो देवीची पूजा करीत होता. वासुदेवरावांनी पुजाऱ्यास ओळखले. वासुदेवराव म्हणाले, ''काय रामजी गुरव, ओळखलेस का आम्हास?'' ''हो दादा, काय, बरे आहात ना?'' अशी त्यांची प्रश्नोत्तरे होत होती.

पार्वतीबाई देवीसमोर बसल्या. त्यांनी देवीची ओटी भरली. जरीचा खण देवीच्या पायांवर ठेवला आणि आपल्या बाळाला देवीच्या पायांवर वाहिला. पार्वतीबाईंचे डोळे पाण्याने भरून आले. इतर स्त्रियांची दृष्टीही पाणावली. मुलाचे नाव ठेवायचे होते. वासुदेवरावांना इतर स्त्रियांनी विचारले, ''नाव काय ठेवायचे?'' हो काय बरे ठेवायचे? वासुदेवराव म्हणाले, ''या बाळाचे नाव अनंता ठेवा. ईश्वराची लीला अनंत आहे. त्या अनंत शक्तिमान परमेश्वराची ही सर्व लीला आहे. त्याच्या कृपेने हा बाळ आम्हाला लाभला. त्या ईश्वराच्या अनंत्वाची, कृपेची क्षणोक्षणी आठवण व्हावी म्हणून याचे नाव अनंत असेच ठेवावे.'' पार्वतीबाईंनी बाळाला मांडीवर घेतले. इतर स्त्रिया जगदंबेला म्हणाल्या, ''आई जगदंबे, या बाळाला तुझ्या चरणावर घातले, हा तुझ्या कृपेचा. याचे नाव अनंत ठेवीत आहोत. त्याला उदंड आयुष्याचा कर.'' पार्वतीबाईंना एक शब्द बोलवत नव्हता. 'आपली चार बाळे गेली. हाच एक ठेवा लाभला आहे. आई अंबे, हा ठेवा नको हो हिरावून नेऊ. संसारातील हा आनंद नको मारू. आम्हां दोघांची आधारयष्टी आशावल्ली ही नाहीशी करू नको. माझा बाल शतायुषी कर.' वगैरे विचार तिच्या मनात खेळत असतील.

गुरवाने नारळ फोडला व सर्वांना प्रसाद मिळाला. देवीसमोर वासुदेवरावांनी पाच रुपये ठेवले. पुजारी देवीजवळ उभा राहून म्हणाला, ''जय आई जगदंबे, झोळायी, सोमजाई, हे वासुदेवराव बरवे, यांचा हा मुलगा तुझ्या पायावर त्यांनी घातला आहे. तुझी ओटी भरली आहे. त्या सर्वांना मुलांबाळांसह देशी परदेशी मुलखात, परमुलखात, जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी सदा सुखरूप ठेव जय आई!'' असे म्हणून पुजाऱ्याने देवीजवळ प्रार्थना केली. पुजाऱ्याला मिळकत झाली होती. तो खूष झाला होता.

सर्वच मंडळींनी देवीचा धुपारण्यातील अंगारा लावला व बाळालाही लावला. घरी आली. वासुदेवरावांनी सत्यनारायण केला. गणपतीच्या देवळात विद्वान वैदिक भिक्षुकांचे म्हणणे (मंत्र) करवले व त्यांना दक्षिणा दिली. अशा रितीने पाच-सहा दिवस आपल्या गावी राहिले व रजा संपत आली म्हणून पुन्हा आपल्या नोकरीवर जाण्यासाठी निघाले. चांगला दिवस पाहून ते निघून गेले.

अनंताचे उष्टावण भुसावळला आल्यावर केले. पार्वतीबाईंचे माहेरचे जवळचे कोणी नव्हते. उष्टावण मामाने करायचे असते व खिरीत सोन्याची अंगठी बुडवून ती मुलाच्या तोंडाला लावायची असा रिवाज आहे. अनंताला मामा कोठे होता? वासुदेवरावांनी शेजारचा वामन बोलावला होता. वामन हा मोठा प्रेमळ मुलगा होता. वामनाने उष्टावण विधी केला. खीर केली होती व पुऱ्या केल्या होत्या.

प्राणांचे पांघरुण घालून अनंताला उभयतां वाढवीत होती. तो आता दुडूदुडू चालू लागला. कधी बाहेर मातीत बसे व लोळून येई. मांजरीच्या पोरांशी तर काय खेळायचा. अनंता खेळकर होता. बश्या नव्हता. तो सर्वांना आवडे. अनंताचे बोबडे बोल ऐकून आई-बापांचा आनंद गगनात मावत नसे. मुलाचे गोडशब्द ऐकण्याचे भाग्य इतक्या कष्टानंतर व इतकी मुले गेल्यावर त्यांना आता लाभले होते. वासुदेवराव घरी ज्या दिवशी असत, त्यावेळेस अनंताला जवळ घेऊन परवचा शिकवित. वक्रतुंड महाकाय वगैरे

नगर वाचनालय सातारा.
संगणकीकृत

श्लोक शिकवित. आपली ही पूर्वपरंपरा होती. तिथी, वार, नक्षत्रे, महिने, राशी, काही लहान स्तोत्रे, ध्येय सदा सवितृ मंडल, वगैरे लहानपणी मुलगा तीन-चार वर्षांचा होत नाही तोच शिकवित. ज्या दिवशी वासुदेवराव ड्यूटीवर असत, त्या दिवशी पार्वतीबाईच अनंताच्या शिक्षकीण व्हावयाच्या. त्याला त्या लहान काऊचिऊच्या गोष्टी सांगत. 'एक होता कावळा, एक होती चिमणी. कावळ्याचे घर होते शेणाचे.... चिमणीचे होते मेणाचे. मोठामोठा पाऊस आला आणि कावळ्याचे घर गेले वाहून. मग कावळा आला चिमणीकडे व हातापाया पडून म्हणाला, 'चिमणुलीबाय, चिमणुलीबाय, तुमच्या घरात येऊ?' अशा गोष्टी लहानपणी अनंताला किती आवडत. अनंताने सूर्यास नमस्कार घालावे, देवबाप्पाला मोरया करावा, नमस्कार सूर्याला घातल्यावर ते पेल्यातील पाणी तुळशीला घालावे व आपल्या गोड शब्दांत -

'आदित्यस्य नमस्कार ये कुर्वन्ति दिनेदिने
जन्मांतर सहस्त्रेषु दारिद्रं नोपजायते'

हा श्लोक म्हणावा व तो ऐकताना अनंताला कोठे ठेवू कोठे न ठेवू असे पार्वतीबाईंस वाटे.

अनंताला एका चांगल्या दिवशी शाळेत घातले. त्याची पिशवी किती सुंदर होती. लहानशी पाटी व त्या पाटीवर अनंताचे नाव घातले होते. अनंता हुशार होता. कविता वगैरे त्याला एवढ्या वयात किती तरी येत होत्या. अनंता पहिलीत गेला, दुसरीत गेला. अशा रीतीने तो तिसरीत गेला. त्यावेळेस अनंताची मुंज करावयाची असे ठरविले. अनंताची मुंज मोठ्या थाटाने झाली. कोकणातून काही नातलग आले होते. भिक्षावळ तर फारच थाटाची काढली.

अनंता आता मोठा झाला. दहा वर्षांचा झाला व त्याला इंग्रजी शाळेत घातले. अनंता आळशी नव्हता. बाजाराच्या दिवशी बाजारात जाई व सर्व सामान घेऊन येई. कधी 'मी जात नाही' असे म्हणत नसे. अनंता आई-बापांचा जीव की प्राण

होता. ते त्याचे किती तरी लाड करीत. परंतु अनंताने आई-बापाच्या प्रेमाला हिणकसपणा आणला नाही. तो सद्‌गुणी, सद्‌वर्तनी निघाला. लहान वयात त्याला कितीतरी जाणीव होती. त्याला वासुदेवरावांनी एक सुंदर कोट केला. त्याला बराच खर्च आला. आईजवळ अनंता म्हणाला, ''आई, बाबांनी एवढा खर्च करून हा अंगरखा कशाला केला? आमच्या वर्गात राघू आहे. त्याला चांगला शर्टसुद्धा नाही. बाबा एवढे कष्ट करतात. आई, ते स्वत:ला चांगला का गं नाही कोट करीत?'' पार्वतीकाकू म्हणत, ''किती रे चांगली तुझी बुद्धी. हीच सद्‌बुद्धी टिको हो बाळ तुझी. अरे, तुला कपडे द्यावे, तुला नटवावे असे त्यांना वाटते. आमचा सारा जीव तुझ्यावर हो.'' अनंता म्हणे, ''आई, इतर मुलांवर तुझे नाही का गं प्रेम? तू त्या राघूला देशील का गं एक सदरा शिवून?'' पार्वतीबाई म्हणत, ''देईन हो.''

नगर वाचनालय सातारा
बाल विभाग

अनंताचे असे बोल ऐकले म्हणजे पार्वतीबाईंचे मन भरून येई. वार्षिक परीक्षा झाली. अनंता दुसरीतून तिसरीत गेला. तिसरीत तो असतानाची ही गोष्ट आहे. अनंताच्या शेजारचा त्याच्या वर्गातीलच एक मुलगा मासिक परीक्षेत पहिला आला. आपल्या शेजारचाच मुलगा पहिला आला व आपण आलो नाही. आपल्या आईला खाली मान घालावी लागेल असे अनंताला वाटले. त्या माऊलीच्या मनात तसे कधी आलेही नाही. पण अनंताचे थोर मन त्याला असे सांगू लागले. आईजवळ अनंता आला व म्हणाला, ''आई, पुढल्या मासिक परीक्षेत जर मी पहिला आलो नाही तर मला जेवायला नको घालू. बाबा एवढे काम करतात व मला सर्व वेळ अभ्यासास असताना मी का बरे पहिला येऊ नये?'' आई म्हणाली, ''बाळ, असे करू नये. पहिला काय नि दुसरा काय? तू कधीच नापास झाला नाहीस. आपला पास होत जा म्हणजे झालं. तेवढ्याने आम्हाला आनंद आहे. उगीच मनाला काही लावून घेऊ नकोस.'' तरी पण अनंताने ते ऐकले नाही. त्याने झटून अभ्यास केला व खरोखरच तो पहिला आला. पार्वतीबाईंचे

हृदय वात्सल्याने भरून आले. ''अनंता, इतका नको हो अभ्यास करू. अरे प्रकृती सांभाळली पाहिजे. ते बघ तुझे डोळे जरा खोल गेल्यासारखे दिसतात आणि अलीकडे जरा वाळलास सुद्धा. दूध घे सांगते, तेही नको म्हणतो.'' अनंता म्हणाला, ''आई, तुला मी आपला वाळलेला दिसतो. पण तालीम मास्तर तर हल्ली अनंताचे शरीर चांगले पिळदार दिसू लागले आहे असे म्हणतात. हल्ली मी लाठी छान फिरवतो. आई, दूध नी बिध कशाला? गरिबांना कोठे गं असते? बाबांचा पगार वाढला म्हणजे मग घेत जाईन हो दूध.'' असे अनंता बोलू लागला म्हणजे पार्वतीबाईंना अनंता म्हणजे अमोल रत्न का बरे वाटू नये?

अनंता पाचवीत होता. ते असहकारतेचे दिवस होते. भुसावळ येथेही असहकारतेच्या लाटा उसळत होत्या. स्वदेश, खादी, राष्ट्रीयशिक्षण यांच्या कल्पनाप्रसाराचा तो काळ. अनंता व्याख्याने ऐकू लागला, वर्तमानपत्रे वाचू लागला. यंग इंडिया लायब्ररीत जाऊन तो वाचण्याचा प्रयत्न करी. अनंताची नैसर्गिक, दिलदार व उदार वृत्ती देशभक्तीने रंगू लागली. भावनाप्रधान तो होता. खादीचा सदरा व टोपी तो घालू लागला. त्याच्या वडिलांचे मित्र एकदा आले होते व अनंताला म्हणाले, ''ही रे कसली भुतासारखी सुतक्यासारखी टोपी घालतोस? चांगली स्वस्त बारीक धोतरे मिळतात तर या पासोड्या कशाला?'' अनंता एकदम उसळला व म्हणाला, ''काय महात्माजी जी टोपी घालतात, त्यांना तुम्ही भूत म्हणणार! असे बोलता तरी कसे तुम्ही? ज्यांनी देशासाठी प्राण हातात घेतले आहेत, त्यांना तुम्ही पोटार्थी व सुखार्थी लोकांनी असे म्हणावे? मी आजपासून तुमच्याजवळ बोलणार नाही. आपल्या थोर देशभक्तांची निंदा करणाऱ्यांचा सहवास मला नको.'' अनंता असे बोलू लागला की त्याच्या आई-बापांच्या मनात चर्र होई. एक दिवस हाता तोंडी आलेला हा बाळ निघून तर नाही ना जाणार? हा विचार मनात येताच पार्वतीबाईंचे मन भरून येई व आई जगदंबे, ही सुखाची जोड सोडू नको.

तुला पदर पसरते. माझा हा बाळ नेऊ नको, नको नेऊ असे ती म्हणे.

आईजवळ अनंता म्हणे, ''आई, मला देशसेवा करावयाची आहे. देशासाठी काही तरी करावे असे वाटत आहे. ही सरकारी शाळा नको; कसले हे शिक्षण? या शिक्षणाने का आम्ही राष्ट्र उद्धरणार आहोत? खादीचे काम शिकून खादीप्रसारक व्हावे असे मला वाटते.'' पार्वतीबाई म्हणत, ''बाळ, मोठा हो व मग कर हो देशकार्य; पण हे तुझे शिकण्याचे दिवस आहेत. पोरवय.''

परंतु अनंताचे पोरवय पटत नसे. वासुदेवराव अनंताला म्हणत, ''अनंता, तू शिकशील तेवढे शिक. प्रथम एम. ए. वगैरे हो. म्हणजे समाजात काम करावयास गेलास तर मान मिळेल. म्हणतील एम. ए. असूनसुद्धा खेडेगावात काम करतात.'' अनंता म्हणे, ''बाबा, मला नको मान. देशसेवा मी करीत आहे, हाच केवढा मान! मला 'भारतसेवक' असे म्हणवून घेण्यातच आनंद वाटेल. बाबा, मला तुम्ही मुंबईच्या राष्ट्रीय शाळेत पाठवता का?''

एकटा मुलगा हातचा जाऊ नये म्हणून आई-बापांनी त्याला मुंबईच्या राष्ट्रीय शाळेत ठेवला. अनंताच्या भावना तेथे वाढू लागल्या. तो दादर येथे असलेल्या मुंबईच्या प्रांतिक काँग्रेस कमिटीच्या ऑफिसात जाई. तेथे अनेक गोष्टी व कामंही आनंदाने करी. चरख्यावर सुंदर सूत काढावयास तो शिकला. मनाने व कृतीने अनंता देशभक्ती शिकत होता. त्याला लाठी वगैरे चांगली येई. राष्ट्रीय शाळेतील मुलांना वगैरे तो जमवून लाठी शिकवी व राष्ट्रभक्तीची गाणी शिकवी. अनंता अशा रीतीने वर जात होता. मनाने उन्नत होत होता. परंतु त्याच्या आई-बापांचे मन खाली-वर होत होते. अनंता काय करील काय नाही या विचाराने त्या दोघांस झोपही येत नसे.

हिंदुस्थानात प्रिन्स ऑफ वेल्स येणार होते व त्यांच्या स्वागतावर बहिष्कार घालावयाचे सर्व राष्ट्राने ठरविले होते. देशबंधूदास यांना तुरुंगात घातले होते व अनेक स्वयंसेवक कारागृहात जात

होते. देशबंधूंचा मुलगा चित्तरंजन हाही तुरुंगात गेला. देशातील वातावरण भारले होते. तरुणांची मने देशभक्तीने वेडी झाली होती. तुरुंगात जावयास ते उत्सुक होते.

मुंबईस स्वागतावर बहिष्कार घालण्याची जंगी तयारी झाली होती. प्रिन्स किनाऱ्यावर उतरले. सरकारी अधिकारी, संस्थानिक स्वागतार्थ हजर होते. परंतु रस्त्यात सर्वत्र शुकशुकाट होता. काही पारशी लोक त्यांनी दुकाने वगैरे उघडी ठेवली होती. हरताळ पाळावयाचा होता.

तो पाहा, एका पारशाच्या दुकानावर दगड मारला गेला. ते पाहा, काही पारशी लोक स्वागत पाहण्यास गेले होते म्हणून त्यांच्या टोप्या उडवण्यात आल्या. पारशी हे हिंदूंना काही चाहत नाही. मारामारीवर प्रकरण आले व ही ठिणगी भडकली. रस्त्यात पारशी व हिंदू यांच्यात मारामारी सुरू झाली. मुसलमानही त्या लढ्यात पडले. ते हिंदू, मुसलमान ऐक्याचे दिवस होते. सर्व मुंबानगरीत दंगा माजून राहिला. प्रिन्स आले व मुंबापुरीत वणवा पेटला. हिंदूंच्या मोठ्या वस्तीत पारशांना चोप बसला तर पारशांची जेथे वस्ती जास्त तेथे हिंदूंना मार मिळाला. पारशी समाज सुखी आहे, त्यांचे तरुण धष्टपुष्ट असतात. जवळ जवळ ते शरीराने व मनाने युरोपियनच झाले आहेत. सरकारचे लष्कर गोळीबार करू लागले. सरकारने पारशी लोकांना स्वसंरक्षणार्थ पिस्तुले वगैरे दिली अशा कथा आहेत. पारशी लोक हिंदूंच्या घरात शिरूनही अत्याचार करीत होते. मोटारीतून बसून पारशी लोक चौफेर पिस्तुले झाडीत होते. महात्माजी मुंबईस आले व त्यांनी उपोषण सुरू केले. सरकारला जो दंगा आवरला नाही, तो महात्माजींनी आवरला. सरोजिनी नायडू, महात्माजी, शौकत अली, वगैरे पुढारी सर्वत्र 'शांत व्हा, शांत व्हा' असे सांगत हिंडत होते.

दंगा ऐन भरात आला होता. तो पाहा, तेजस्वी दृष्टीचा, खादीचा शर्ट घातलेला व धोतराचा काचा मारलेला एक तरुण हातात लाठी घेऊन गरगर फिरवीत काँग्रेस ऑफिसामधून बाहेर

पडला. कोण बरे तो? तो तर अनंता. देशाभिमानी अनंता अनंत गर्दीत मिसळला. देशद्रोही पारशांची त्याला चीड आली व अनंत जनकल्लोळात विलीन झाला. गरगर लाठी फिरवीत अनंता चालला होता. तुफान सागरात अनंताने आपली जीवित नौका लोटून दिली होती. त्याला आपल्या आई-बापांची, वयस्कर झालेल्या मातापित्यांची त्या भावनाभरात आठवण राहिली नाही. जिवाला जपणारा तो नव्हता. काय होईल ते होवो, हिंदूंवर पारशी हल्ले करीत असता आपण काय खोलीत बसावे? छे! अनंता वीरवृत्तीने हिंदूंचे संरक्षण करण्यासाठी बाहेर पडला.

त्या दिवसापासून अनंताचा पत्ता नाही. मुंबईच्या दंग्यानंतर अनंताचा शोध लागला नाही. अनंताचे काय झाले? तो तुरुंगात गेला का, त्या दंगलीत तर काही बरे वाईट झाले नाही ना? नाव बदलून तर कोठे राहत नाही ना? अनंताबद्दल किती तर्क करावे? कोठे असेल अनंता?

राष्ट्रीय शाळेच्या चालकास अनंताच्या वडिलांची पत्रे आली. परंतु चालकांनी कळवले, अनंता अलीकडे शाळेत येत नाही. दंगा आता शमला होता. पार्वतीबाईंचे मन ते आईचे मन खालीवर होऊ लागले. वासुदेवराव रजा घेऊन मुंबईस आले. कल्याण येथे त्यांचे दुसरे नातलग होते. तेही त्यांच्या बरोबर आले. अनंताचा सर्वत्र त्यांनी शोध केला. काँग्रेस ऑफिसमधील लोकांनी एवढेच सांगितले, ''दंग्याच्या दिवशी तो लाठी हातात घेऊन बाहेर पडला.'' वासुदेवराव कष्टी झाले. त्यांचे हृदय दुभंग झाले. ते पुन्हा माघारी आले. पतीपत्नी पोटभर रडली. त्यांना अन्न गोड लागेना. काही रुचेना, सुचेना. केसरी पत्रातून किती दिवस 'चि. अनंता यास' अशा जाहिराती दिल्या. पण काही ठाव ना ठिकाण!

पार्वतीकाकूंनी संकट सोमवार केले, अनेक नवस केले. परंतु अनंता आला नाही, त्याचे कुशलवृत्त कळले नाही.

❀❀

गुरुवर्य सावळाराम मास्तर

'सदैव पुण्यस्मरणं महात्मनाम्'

थोर पुरुषांचे स्मरण करणे हे सदैव पुण्यप्रदच असते. मुलांनो, आपल्या शाळेच्या अगदी समीप जी तत्त्वज्ञान मंदिर संस्था आहे, ती तुम्हास माहीत असेल. परंतु या संस्थेचा उत्पादक कोण? प्रतापशेठजींस ही संस्था स्थापन करण्यास स्फूर्ती कोणी दिली? याचा इतिहास तुम्हास माहीत नसेल.

ही संस्था स्थापन करणारे, तत्त्वज्ञानाचा सांगोपांग अभ्यास व्हावयासाठी सर्व हिंदुस्थानात केवळ एकमेव अशी ही संस्था स्थापणारे जे थोर पुरुष, त्यांचे नाव सावळाराम मास्तर असे होते. त्यांचे उपनाव नाईक असे होते. ते मूळचे चोपडे येथे राहणारे. तेथे त्यांचे घर वगैरे आहे. आपले श्री. प्रतापशेठ यांस तेथे ते लहानपणी शिकवित. म्हणून त्यांस 'मास्तर साहेब' असे म्हणत. प्रतापशेठजी एक गोष्ट सांगतात, 'माझ्याकडून एकदा मोडी वाचीत असताना चूक होत होती. त्यांनी माझ्याकडून चोवीस वेळा वाचून घेतले.' यावरून पक्के ज्ञान व्हावे यासाठी ते काळजी घेत. पाया मजबूत करून मग वर इमारत उभारावी हे प्रतापशेठ त्यांच्यापासूनच शिकले. सावळाराम मास्तर हे उत्कृष्ट सतार वाजवीत. त्यांस गाण्याची सर्व शास्त्रीय माहिती होती. ते ती सर्व माहिती

... वाचनालय ...
बाल विभाग

घरी स्वप्रयत्नाने शिकले. त्यांस गाण्याचा फार नाद. त्यांनी आपल्या एका मुलीला गावयास शिकवले व तीपण गुणग्राही असल्यामुळे शिकली. सावळाराम मास्तर हे वेदांततीर्थ होते. तर्कशास्त्र, वेदांतशास्त्र यांचा त्यांनी फार अभ्यास केला होता. त्यांची बुद्धी फार कुशाग्र होती. बुद्धीला पटेल तेच ते ग्राह्य मानीत. ते इंग्रजी शिकले नव्हते, तरी त्यांचे विचार फार सुधारलेले होते. इंग्रजी येत नसले तरी ज्या इंग्रजी तत्त्वज्ञानाचे ग्रंथ मराठीत भाषांतरीत झाले आहेत, ते त्यांनी वाचून त्या तत्त्वज्ञानाची त्यांनी माहिती करून घेतली.

शंकराचार्यांचे तत्त्वज्ञान त्यांस पटले होते. त्या तत्त्वज्ञानाचा शेटजीस त्यांनी सतत उपदेश केला व हुशार आणि बुद्धिमान शेठजींस ते पटले. सतत उद्योग करून मनात मात्र उदास व अलिप्त राहावयाचे हे ते तत्त्वज्ञान होय.

पुढे शेठजीस त्यांनी या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी ही संस्था काढावयास स्फूर्ती दिली. येवले येथील एक श्रीमान शेठ व प्रतापशेठ या दोघांनी ही संस्था इ. स. १९१६ मध्ये स्थापिली. पौर्वात्य व पाश्चिमात्य तत्त्वज्ञानांचा अभ्यास करून विवेकानंद, रामतीर्थ यासारखे उपदेशक, हिंदुस्थानचा गौरव वाढविणारे तत्त्वज्ञ येथून बाहेर पडावेत ही त्यांची मोठी महत्त्वाकांक्षा होती.

जुने व नवे यांचे संमिश्रण ते करीत. नवीन पद्धतीने शिकलेले जुन्यास मानीत नाहीत. जुने नव्यास धर्मबाह्य समजतात. परंतु सावळाराम मास्तर सहिष्णू होते, ते उदार होते. बुद्धीस जे पटेल, तर्काच्या कसोटीस जे उतरेल, तेच सेव्य असा त्यांचा निःस्पृही बाणा असे.

संस्था स्थापन झाल्यावर येथे मोठमोठे वक्ते, आचार्य येऊ लागले. प्रो. मलकानी यांस विलायतेत पाठवून शिकवून आणले. या संस्थेचा कारभार त्यांनी १९२४ पर्यंत चालविला. १९२४ मध्ये ऑगस्ट महिन्यापासून त्यांची प्रकृती ढासळली व ते एक महिन्याने शांतपणे मरण पावले.

मरण्याच्या आधी दोनच दिवस त्यांचे अत्यंत स्फूर्तिप्रद

असे व्याख्यान झाले. त्यावेळचा त्यांचा तो तेजस्वी चेहरा, ते झगमगीत डोळे अद्यापही माझ्यासमोर दिसताहेत. माझ्या सर्व व्यवहाराच्या पाठीमागे 'अहं, अहं मी' असतो याचे ते विवरण करीत होते. परत हे त्यांचे व्याख्यान शेवटचे ठरले. दोन दिवसांनी त्यांचे देहावसान झाले. मरताना तळमळ नाही, खिन्नता नाही, काही नाही 'सुटला देह राम', हे त्यांचे शेवटचे शब्द. मृत्यूसमयीच्या स्थितीवरून मनुष्याची खरी योग्यता दिसते. या शांत मरणशब्दांवरून सावळाराम मास्तर हे योग्याप्रमाणे होते, असे नाही का दिसत?

सावळाराम मास्तर हे निर्लोभ होते. एखाद्या स्वार्थसाधू माणसाला शेठजी प्रसन्न झाल्यावर किती पैसे लाटता आले असते. एकदा श्री. प्रतापशेठ सावळाराम मास्तरांस म्हणाले, "मास्तर साहेब, आज मला तुम्हाला काही द्यावयाचे आहे. जेवढी जमीन मागाल, पैसे मागाल तेवढे देतो." सावळाराम मास्तर घरी आले व आपल्या पत्नीस विचारते झाले. ते तिला म्हणाले, "वर्षास आपल्याला जास्तीत जास्त ५०० रुपये खर्चास लागतात, नाही का? तर तेवढे उत्पन्न ज्या जमिनीचे येईल तेवढे मागतो. म्हणजे झाले." त्यांची पत्नीपण स्वाभिमानी होती. अधिकाराची ती हपापलेली नव्हती. झाले, त्याप्रमाणे सावळाराम मास्तरांनी फक्त तेवढ्या उत्पन्नाची जमीन मागितली. शेठजीसारखा लखपती प्रसन्न झालेला व सर्वस्व दानी सिद्ध झालेला, परंतु सावळाराम मास्तर निर्लोभी होते. म्हणूनच शेवटपर्यंत व मृत्यूनंतरही शेठजींची त्यांच्यावर ही अचल श्रद्धा आहे.

ते दिसावयास उग्र दि.त. परंतु त्यांचे मन कोमल होते. घरात जरा कोणी आजारी पडले तर तेच त्याच्याबद्दलच्या विचाराने आजारी पडावयाचे. मुलांस ते कधी रागे भरत नसत, मारीत नसत. मुले साहजिकच निसर्ग नियमाप्रमाणे वाढू देत. मारून मुटकून त्यांस वळण लावावे ही तात्यापंतोजी पद्धत त्यांची नव्हती.

ते शौचास नेहमी लांब बाहेर जावयाचे. मरावयाच्या आदल्या दिवसापर्यंत ते बाहेर शौचास गेले. मुंबईस वगैरे गेले तर बाहेर

शौचास जाण्यास सापडणार नाही. म्हणून ते अमळनेर सोडून कोठे बाहेर सहसा जात नसत.

सावळाराम मास्तर गेले. परंतु तत्त्वज्ञान मंदिर संस्था हे त्यांचे स्मारक आहे. त्यांचा आत्मा या संस्थेसभोवार फिरकत असेल. भारतवासियांनी येथे नीट अध्ययन करून आर्य तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करावा म्हणजे संस्थापकांच्या श्रमांचे चीज होईल.

राम रघुनाथराव

रघुनाथरावांचे वय साधारण चाळीस वर्षांचे असेल. ते शरीराने उंच होते. त्यांची अंगकाठी मजबूत जरी नसली तरी बरी होती. त्यांचे नाक मोठे पाणीदार दिसे व त्यांच्या डोळ्यांत एक प्रकारचे तेज होते. त्यांचा करारीपणा त्यांच्या मुद्रेवर स्पष्टपणे दिसत असे. रघुनाथराव हे कष्टदशेतूनच वर आलेले होते. स्वावलंबनाने ते मोठ्या स्थितीस प्राप्त झाले होते. ते मोठे झाल्यावर आपली पूर्वीची स्थिती विसरून उद्धट झाले नव्हते. ज्या गृहस्थांच्या साहाय्याने त्यांना लहानपणी आधार मिळाला, त्या गृहस्थांच्या मुलीस ते अजून सख्ख्या बहिणीप्रमाणे मानतात व तसे प्रेमाने वागतात. या अर्वाचीन यांत्रिक युगात, या अर्वाचीन पोटार्थी युगात अशी कृतज्ञता क्वचित दिसून येते.

रघुनाथराव लहानपणापासून सच्चे होते. ते हुशार होते व शाळेत किंवा कॉलेजात त्यांचा अभ्यास तरतरीत असे. सर्व परीक्षांत ते उत्कृष्टपणे पास झाले होते. थोडा परंतु नियमित अभ्यास करूनही ते एम. ए. दुसऱ्या वर्गात पास झाले. त्यांना एका प्रसिद्ध कॉलेजात प्रोफेसराची जागा मिळाली. तेथे रघुनाथराव प्रोफेसर झाले असते, तर आज त्यांचा पगार पुष्कळ असता, कदाचित युनिव्हर्सिटीमध्ये वगैरे ते निवडून गेले असते. त्यांचा बोलबाला

जरा जास्त झाला असता. परंतु ही संपत्तीची चाड त्यांना नव्हती. फार मान मान्यतेस ते हपापलेले नव्हते. त्यांचे इतर बंधू मोठमोठ्या सरकारी नोकरीमध्ये शिरले. परंतु रघुनाथरावांना हा मोह शिवला नाही. मुंबईच्या प्रोफेसरीवर त्यांनी लाथ मारली व दूरच्या एका लहानश्या शहरात एका शिक्षणसंस्थेस ते मिळाले.

रघुनाथराव यांचा स्वभाव मोठा निश्चयी व करारी. त्यांचे मनही मोठे हळुवार होते. कोणी जरा फट बोलले, तर त्यांना खपत नसे. ते वर्गात अत्यंत कसोशीने शिकवायचे. जे काम हाती घ्यावयाचे ते पूर्णपणे पार पाडणे यात तर त्यांचा हातखंडा असे. मोठ्या माणसास कोणतेच काम हलके वाटत नसते. रघुनाथरावांचे तसेच असे. हिशेबाचे काम असले तर पै पैशापासून ते हिशेब नीट ठेवावयाचे. जमाखर्च नीट जमला नाही तर त्यांना झोप येत नसे. मुलांनी गृहपाठ नीट लिहिले नसले तर ते फाडून टाकावयाचे किंवा मुलास घालवून द्यावयाचे. आपण इतक्या कसोशीने शिकवावे परंतु मुलांनी नीट काम करू नये, याचा त्यांना राग येत असे. रघुनाथराव अत्यंत नियमित होते. शाळेचा तास संपत येण्याच्या आधीच दोन मिनिटे वर्गाच्या बाहेर ते हजर असावयाचे! अंगात कधी कधी १०२ इतका ताप असताही ते शिकवण्यास जात! कर्तव्याची अशी तीव्र जाणीव हल्ली हिंदुस्थानात कितीकांना असते ते ईश्वरासच माहीत! पण रघुनाथराव तरी काळास अपवाद होते. ज्या संस्थेत ते काम करीत होते तेथे इतरही पुष्कळ चांगली माणसे जमली होती. संस्था मोठी आदर्शभूत होती व तिचा लौकिक दूरवर पसरला.

तो असहकारतेचा १९१९-२० चा काळ होता. देशात नुसते आंदोलन सुरू होते. वकील वकिली सोडीत होते. पदवीवाले पदव्या भिरकावून देत होते. शाळा-कॉलेजांतून विद्यार्थी बाहेर येत होते. रघुनाथराव व त्यांचे सहकारी यांच्या मनावरही याचा परिणाम झाल्याशिवाय राहिला नाही. त्यांची मनेही देशभक्तीने पेटली. महात्माजींचे शब्द त्यांच्या मनावर परिणाम करू लागले. झाले! एक दिवस

रघुनाथराव हे ज्या संस्थेत होते ती संस्था राष्ट्रीय शिक्षणाची झाली. त्या संस्थेचे राष्ट्रीय महाविद्यालय झाले व महाराष्ट्रभर सर्वत्र तिचा लौकिक पसरला. चांगली चांगली माणसे मोत्यासारखी मौल्यवान काम करण्यास येऊ लागली. राष्ट्रीय विद्यालय नावारूपास चढू लागले.

राष्ट्रीय विद्यालय ज्याप्रमाणे तेजस्वी होऊ लागले, त्याप्रमाणे तेथील शिक्षक हेही मनाने व कृतीने निश्चयी होऊ लागले. विशेषत: रघुनाथरावांच्या मनोवृत्तीत मोठा फरक घडून आला. त्यांच्या राहणीत साधेपणा येऊ लागला. मिळते घेण्याचा गुण येऊ लागला. मन जरा टीकेला भीत नाहीसे झाले. ज्याला समाजात कार्य करावयाचे आहे त्याने जरा Thick Skined निगरगट्ट झाले पाहिजे. जर कोणी काही बोलले की लगेच कावरे बावरे होऊन भावनाधीन होणे हे समाजसेवकास शोभत नाही. मिशनरी लोक कसे असतात. त्यांचा उपहास होतो, थट्टा होते, अपमान होतो. परंतु ते सर्व सहन करतात. हसण्यावारी नेतात; आपले काम ते कधी सोडावयाचे नाहीत. मिशनऱ्यांचा हा धीमेपणा हिंदी समाजसेवकांनी, संस्थाचालकांनी अवश्य घेण्यासारखा आहे. रघुनाथरावांमध्ये योग्यता होती; प्रचंड उद्योग करण्याची शक्ती होती. निरलसता होती. स्वार्थत्यागीपणा होता. त्याच्या जोडीला आता हा धिमेपणा येऊ लागला. पूर्वी ते मुंबईत होते म्हणून नेकटाय, कॉलर, बूट, विजार ते वापरीत. परंतु आता सर्व गेले. ते आपली जुनी परंपरा आता धरू लागले. साधा सदरा खादीचा व खादीचे धोतर ते परिधान करू लागले. रघुनाथरावांचे मन श्रीमंत होऊ लागले. त्यांच्या मनाची श्रीमंती वाढू लागली.

लाट येते व जाते. तसेच त्यावेळी झाले. राष्ट्रीय विद्यालय दोन वर्षे जोमाने चालले. परंतु पुढे वारे विरुद्ध वाहू लागले. राष्ट्रीय संस्थेची वाताहत झाली. संस्थेजवळ अजून फंड होते. परंतु उपयोग नव्हता. संस्थेतील मोठमोठे लोक संस्था सोडून निघून गेले. रघुनाथरावही जाणार होते. त्यावेळेस मुळशीचा सत्याग्रह

सुरू होता व त्या सत्याग्रहास जाऊन मिळावे, असे रघुनाथरावांच्या मनात रात्रंदिवस येत होते. मनाची नुसती खाई झाली होती, तेथे आग भडकली होती.

नगर वाचनालय सातारा
बाल विभाग

परंतु रघुनाथराव व त्यांचे दुसरे सहकारी यांनी असा विचार केला, 'पुढे आपणास दुसरा उद्योगधंदा करावा लागणारच. या संस्थेजवळ लाख रुपये आहेत. हेही चांगल्या लोकांच्या हातातच जातील याचा काय नेम? आपण ही संस्था पुन्हा युनिव्हर्सिटीस जोडू. पुन्हा पूर्वीचे स्वरूप तिला प्राप्त करून देऊ व मग जाऊ. प्रयोग फसला तर हरकत नाही. ही संस्था सोडून काही जाऊ नये. हिचेच पुनर्जीवन करावे!' असे रघुनाथराव व त्यांचे सहकारी मित्र यांनी ठरविले. बहुतेक इतर सोडूनच गेले होते. रघुनाथराव व त्यांचे एक-दोन मित्र हेच काय ते राहिले. त्यांच्यावर टीका झाली. परंतु रघुनाथराव या टीका सहन करण्यास शिकले होते.

रघुनाथरावांची संस्था पुन्हा अराष्ट्रीय झाली. तरी मनाने रघुनाथराव व त्यांचे इतर राहिलेले सहकारी पूर्ण राष्ट्रीय वृत्तीचेच होते. महात्मा गांधींबद्दल त्यांना पराकाष्ठेचा आदर वाटे. महात्माजींचा 'यंग इंडिया' येताच आधी बुभुक्षिताप्रमाणे रघुनाथरावांनी सर्व वाचून टाकावा. केसरी वगैरे वर्तमानपत्रे महात्माजींची टवाळी करीत म्हणून सात्विक रघुनाथराव संतापत. एक दिवस तर रागाने केसरी त्यांनी फाडून टाकला. परंतु लगेच म्हणाले, "अरे, केसरी संस्थेचा होता. तो फाडण्याचा मला काय बरे अधिकार?" संस्थेच्या वस्तुबद्दल, एका क्षुद्र वर्तमानपत्राबद्दल सुद्धा रघुनाथरावांना किती काळजी! थोर ते थोरच.

रघुनाथरावांना आता संस्थेचे काम फार पडे व तेच म्हणून ते उरकीत. तरीपण राष्ट्रीय संस्था बंद झाल्यापासून रघुनाथरावांच्या मनावर निराशेने पगडा बसवला होता. जगात खऱ्या प्रयत्नाला, खऱ्या ध्येयबुद्धीस यश का मिळू नये? असे त्यांना वाटे. ज्या राष्ट्रीय शिक्षणसंस्थेबद्दल रात्रंदिवस उरस्फोड केली, ती का बरे स्वत:च्या डोळ्यांनी बंद झालेली पाहावी? असे मनात येऊन

नगर वाचनालय सातारा.
संगणकीकृत

त्यांना वाईट वाटे व ते निराश होत. त्यांना जगाचे काही कटू अनुभव आले व म्हणून ते जगाबद्दल साशंक राहू लागले. मनुष्यात चांगुलपणा आहे असे त्यांना वाटत नाहीसे झाले होते. आधी मनुष्य वाईट असेल याच दृष्टीने ते पाहत व मग अनुभवाने स्वत:चे मत बदलावयास लागले तर ते बदलीत. ते म्हणत, ''मनुष्याला प्रथम एकदम चांगला समजून जर तो वाईट निघाला तर फारच निराशा होते. म्हणून प्रथम मनुष्याच्या कोणत्याही गोष्टीकडे मी वाईट दृष्टीनेच पाहतो. मागून निराशा होण्यापेक्षा प्रथमपासून निराश होणे पत्करले. जर त्या मनुष्याच्या कृतीत खरोखर सदैव सद्‌हेतू दिसून येऊ लागला, तर मी मत मागून बदलीन!'' रघुनाथरावांची ही अशी वृत्ती झाली. म्हणून पुष्कळांचा त्यांच्याबद्दल गैरसमज होई. रामचा सुद्धा असाच प्रथम होई.

राम हा पण रघुनाथरावांप्रमाणेच कष्टस्थितीत वाढला. त्यानेही महाप्रयासाने दिवस काढून शिक्षण संपादले. तोही एम. ए. दुसऱ्या वर्गात पास झाला होता. परंतु त्याला त्याचे काही वाटत नसे. लहानपणापासून काबाडकष्ट करण्याची त्याला सवय होती. त्याने गुरांचे गोठे झाडले होते, लाकडे फोडली होती, दळले होते, कांडले होते, झाडांना हंडे खांद्यावर वाहून पाणी घातलेले होते; उष्टी काढली होती. स्वयंपाक केले होते. रोग्यांची, अनाथांची सेवाशुश्रुषा केली होती. संडास व गटारेही त्याने साफ केली होती. त्यामुळे रामला या गोष्टीची कधी लाज वाटली नाही. या त्याच्या स्वभावामुळे त्याचे मित्र त्याला देवसुद्धा म्हणत. राम अर्थात चढून जात नसे. त्याचे स्वत:चे दोष त्याला पूर्णपणे माहीत होते व जेव्हा दुसरे त्याची स्तुती करीत, तेव्हा राम मनात म्हणे, 'देवा, त्यांच्या स्तुतीस थोडा तरी पात्र मी होईन असे कर ना! Prefer My hand to have thy will done' हे तो वाक्य सदैव म्हणे. राम हा परोपकारी व प्रेमळ होता. विद्यार्थी दशेत असता एका भिकाऱ्याने पाय भाजतात म्हणून पायातील जोडा मागितला तर रामने देऊन टाकला होता. रामला

अदेय असे काहीच वाटत नसे. रामला देवळात खिरापत मिळाली तरी ती त्याने आपल्या मित्रांसाठी घरी आणावी. त्याला लहानपणी शेजारी करंजी मिळाली, तर हळूच खाल्यासारखं करून आपल्या लहान भावासाठी घेऊन येई. रामच्या अशा या लहानसान गोष्टींतून त्याचा प्रेमळपणा व नि:स्वार्थपणा शतदा दिसत असे. राममध्ये अनेक दोष होते. परंतु काही खरे गुणही त्याच्या ठिकाणी असत.

रामने आठ वर्षांचा असल्यापासून शेकडो मराठी काव्यग्रंथ व गद्यग्रंथ वाचले होते. वाल्मिकी रामायणाचे मराठी भाषांतराचे भाग त्याने ६ दिवसांत संपवले होते! त्याची स्मरणशक्ती जबर होती. शेकडो कविता त्यास येत व स्वत: कविता करण्याचा नाद दहाव्या वर्षांपासून त्याला लागला. तो हायस्कूलमध्ये तिसऱ्या-चौथ्या इयत्तेत होता, तेव्हा त्याचे मित्र त्याला Boy Poet लहानगा कवी असे म्हणत. पुढे त्याने कविता करण्याचा नाद सोडून दिला व अलीकडे तो पुनश्च कविता लिहू लागला आहे व रामचे लिहिणे सहृदय असते. गद्य असो पद्य असो. तेथे रामचे रक्त ओतलेले असते. त्याचे हृदय तेथे ओतलेले असते. रामचे लिहिणे साधे, सरळ, परिणामकारक असे असते. ते लहान मुलांना आवडते तसे मोठ्यांनाही रमवते.

कर्म धर्म संयोगाने राम हाही रघुनाथरावांच्या संस्थेत काम करण्यासाठी आला. रामचा स्वभाव थोडासा रघुनाथरावांप्रमाणेच होता. राम हा अत्यंत भावनोत्कट होता. जरा कोणी काही बोलले की तो लगेच कावराबावरा होई. माझ्या हातून चूक का झाली याची त्याला रुखरुख लागून राही, याची त्याला चुकचूक लागे. जणू मनुष्याच्या हातून चुका होतच नाहीत! आपल्या हातून मुळीच चूक होऊ नये असे वाटणे म्हणजे एक प्रकारची घमेंडच ती. चुका होऊ नयेत, परंतु झाली आणि त्याबद्दल कोणी जरा बोलले तर ते मनास फार लावून घेऊ नये. त्यात एक प्रकारचा सुप्त अहंकार असतो.

राम संस्थेत आल्यावर त्याचा हा फुलासारखा हळुवार स्वभाव सर्वांस दिसून येऊ लागला. परंतु चांगुलपणा दिसून येऊ लागला. रामच्या लहानपणाच्या कष्टाची हकिकत जेव्हा रघुनाथरावांस कळली तेव्हाच थोडासा चांगला ग्रह त्यांचा झाला असेल! परंतु ते तसे वरून दाखवीत नसत.

रामला आपल्या प्रेमळपणाची, परोपकारित्वाची, दुसऱ्याच्या मदतीसाठी धावून जाण्याच्या गुणाची थोडी घमेंड होती. जगात पुष्कळवेळा असे होते की, सद्‌गुणांनाच हळुहळू दुर्गुणांचे रूप येऊ लागते. माझ्या ठिकाणी अहंकार नाही, या गोष्टीचाच अहंकार वाटू लागला! माझ्या ठिकाणी गुण आहेत, अशा गर्वाची कीड गुणास लागते. रामचेही तसेच असेल. रघुनाथराव व इतर मंडळी जमली म्हणजे प्रेम, सत्य वगैरेबद्दल वाद निघावयाचेच!

तो दिवस रामला अजून आठवतोय व आठवला म्हणजे रामचे मन दु:खी होते. रात्री दहा वाजले असतील. रामच्या खोलीत वादास मोठे तोंड लागले होते. रघुनाथराव म्हणत होते, 'प्रेम वगैरे सर्व झूठ आहे. या जगात आईचे मुलावर प्रेम नाही, मित्राचे मित्रावर नाही. प्रेम ही वस्तू जगात नाहीच मुळी. उगीच कवी प्रेमाचे स्तोम माजवितात. प्रेम जर असते तर आईच्या विरहाने मुलगा मरून गेला असता; पुत्र विरहाने आईबाप मेले असते. खरे प्रेम तेव्हाच दिसते असे मी म्हणेन, केव्हा तर जेव्हा प्रेमासाठी मनुष्य मरावयास तयार होईल. परंतु जगात पहिली बायको मेली तर तिच्या सुतकातच पुनर्विवाहाची तयारी करणारे नवरोबा या जगात आढळतात, हे काय प्रेम!' रघुनाथरावांच्या या म्हणण्याबद्दल आज रामला खात्री वाटते. परंतु त्यावेळेस वाटत नसे. राम त्यावेळेस म्हणाला, "काय म्हणता रघुनाथराव, आईचे मुलावरील प्रेम हेही शुद्ध नाही?" रघुनाथराव म्हणाले, "हो, मी असे म्हणतो काय करता?" राम बेभान होऊन म्हणाला, "कोणत्या तोंडाने तुम्ही म्हणता? ही जीभ तुटून गेली असती तरी चालले असते." रघुनाथराव पण म्हणाले, "मग तुम्ही

टाका तोडून.'' राम म्हणाला, ''शक्ती असती तर टाकली असती हो तोडून.'' अशाप्रकारे तो वाद झाला. वाद झाला, परंतु रामला झोप आली नाही. आपण रघुनाथरावांस वादाच्या भरात काय बोलून गेलो याचे त्याला वाईट वाटू लागले. रघुनाथराव आपल्याहून मोठे, केवढे कार्यकर्ते व स्वार्थत्यागी! आपण त्यांस असे बोलावे याचे त्याला वाईट वाटले. दुसऱ्या दिवशी राम जेवला नाही. रघुनाथराव त्याच्या खोलीत येताच त्याने त्यांना साष्टांग नमस्कार घातला व 'मला क्षमा करा,' असे म्हणाला.

हळुहळू रामला रघुनाथरावांचा स्वभाव कळून येऊ लागला. रामचे वडील वारले होते व रामला वडिलांचे कर्ज फेडण्यासाठी म्हणून भावाला एकदम पैसे पाहिजे होते. तीनशे रुपयांची रामला आणखी जरुरी होती. त्याने रघुनाथरावांस आपल्या मित्रांकडून विचारले व रघुनाथरावांनी ताबडतोब तीनशे रुपये दिले. रघुनाथराव दिसतात तसे कठोर नाहीत. त्यांच्याही मनात मृदूता आहे, ह्याचा अनुभव रामला हळुहळू येऊ लागला व रामच्याही अंगचे काही खरे सद्‌गुण रघुनाथरावांस दिसून येऊ लागले. दोघे एकमेकांस नीट ओळखू लागले. परंतु मनातून परस्परांबद्दलची एक प्रकारची भीती गेली नव्हती.

त्या वर्षी रघुनाथराव मुंबईस गेले होते व रामही मुंबईस भावाकडे गेला होता. रामच्या मनात कितीदा आले की रघुनाथरावांना जाऊन भेटावे म्हणून परंतु त्याला धैर्य झाले नाही. त्याने रघुनाथरावांना मग मुंबईहून परत गेल्यावर पत्र लिहिले, ''मी आपणाकडे मुंबईस असूनही आलो नाही, म्हणून आश्चर्य वाटले असेल, परंतु आपणास मी भितो म्हणून येता आले नाही!'' रघुनाथरावांनी रामला त्यावेळेस एक मोठे पत्र लिहिले व ते म्हणाले, ''जसे तुम्ही आम्हाला भिता, तसे आम्ही तुम्हास भितो. एखाद्यावेळेस तुम्हास काही सांगितले तर तुम्हास काय वाटेल याची मनात भीती वाटते.

तुमच्याजवळ फार जपून वागावे लागते, न जाणो एखादा शब्द उद्देश नसतानाही तुम्हास लागावयाचा!'' रघुनाथरावांबद्दल रामला जास्त आपलेपणा वाटू लागला. हे पत्र कारणीभूत झाले. जरी परस्परांची मने एकमेकांबद्दल आता नि:शंक होती तरी एकमेकांजवळ फारसे बोलणे चालणे कधीच होत नसे. रामला तर बोलण्याचाच आधी कंटाळा व त्यातून ज्याच्याबद्दल त्याला आदर वाटतो, त्यांच्याजवळ त्याला बोलण्यास येतच नाही. तो फार तर चिठ्ठी किंवा पत्र पाठवून आपले म्हणणे रघुनाथरावांस कळवावयाचा.

रामला आता असे वाटे की, आपली कोणतीही गोष्ट रघुनाथरावांस न आवडणारी होऊ नये. आपल्या कोणत्याही गोष्टींबद्दल रघुनाथराव काय म्हणतात याचीच त्याला भीती असे. रघुनाथरावांनी स्तुती केली किंवा चांगले म्हटले म्हणजे रामला आनंदास आकाश ठेंगणे होई. रामचे तोंड कळाहीन होई.

तो दिवस रामला अजून आठवतो. रामच्या शाळेतील शिक्षकांची सभा होती व राम काही तरी असे बोलून गेला की जे चांगले नव्हते. रामने असे बोलावे हे रघुनाथरावांस आवडले नाही. भावनांच्या भरात राम बोलून गेला. परंतु राम घरी आला व विचार करू लागला. त्याला आपण काय केले हे समजून आले. राममध्ये हा एक गुण होता की स्वत:च्या चुकांतच तो मोठेपणा मानीत नसे. आपल्या चुकांबद्दल तो रडे. पुन्हा आपण असे पडू नये म्हणून तो खटपट करण्याचा प्रयत्न करी. रामने आपल्या या स्वभावानुसार दुसऱ्या दिवशी सर्व शिक्षकांची क्षमा मागणारे पत्र लिहून ते शिक्षकांच्या खोलीत ठेवले. रामच्या या वर्तनामुळे रघुनाथरावांना आनंद झाला व त्यांनी त्या चिठ्ठीवरच खाली लिहिले, 'कालच्या आपल्या कृत्याने जितके वाईट वाटले, त्याच्या शतपट समाधान आज आपल्या या कृत्याने होत आहे.' रामला ते शब्द वाचून किती आनंद झाला तो त्याचा त्यालाच ठाऊक! रघुनाथरावांनी ते लिहिलेले शब्द रामने शंभरवेळा वाचले. माझ्या कृत्याने रघुनाथरावांस समाधान झाले या विचारानेच त्याला स्वर्ग मिळाल्यासारखे झाले.

रघुनाथरावांना जरी मनुष्याने लिहिणे वाचणे फारसे आवडत नसे तरी रामच्या लिहिण्याबद्दल ते तसे बोलत नसत. रघुनाथरावांचे म्हणणे एका दृष्टीने बरोबर असे. प्रत्यक्ष कृतीच्या नावाने पूज्य! लिहिणारे बोलणारच फार असे ते म्हणत. त्यांना जर कोणी सांगितले की एखादा निबंध लिहा तर म्हणत, 'एक खोली झाडून दाखवतो, एक खळगा खणून दाखवतो. हाच माझा निबंध. Action is my essay.' रघुनाथरावांचे हे म्हणणे रामलाही मान्य असे. कोणतेही हलके काम असो, राम ते करण्यास मागे पुढे पाहत नाही, त्यात कमीपणा मानीत नाही हे रघुनाथरावांस कळून चुकले होते व म्हणून रामने एखादा निबंध लिहिला तरी ते चांगला म्हणत. रामही काही लिहावयाचे झाले तर हृदय ओतून लिही, कष्ट व प्रयत्न करून लिही. वेळ मारीत नसे.

रघुनाथरावांच्या कोणत्या गुणामुळे एवढा त्यांच्याबद्दल आपलेपणा वाटू लागला? एक कारण म्हणजे रघुनाथराव प्रेमळ आहेत, हे त्याला समजून आले. शाळेतील मुलगा आजारी पडला तर रघुनाथराव त्याला आपल्या घरी आणीत, त्याला जेवावयास वगैरे घालीत. त्याची घरच्या सारखी काळजी घेत. रघुनाथरावांचे हृदय फार मोठे होते. कोणत्याही कार्यात ते कसे समरस होतात हे रामने पाहिले होते. एकदा शाळेच्या मालकीची म्हैस हरवली तर रघुनाथरावांना काही सुचेना. म्हैस सापडली तेव्हा जेवण त्यांना गोड वाटले. मुलांचे खेळ असोत, तेथे मुलांसारखे ते वागत. ते मोठे चपळ, उत्साही होते. थोरांत थोरांसारखे व लहानांत लहानांसारखे ते होत. मुलांच्या मॅचेस असल्या तर कमी प्रतीची जी बाजू असेल तिचा नेहमी ते कैवार घ्यावयाचे. मुलांच्या, शिक्षकांच्या प्रकृतीची सर्वतोपरी काळजी वाहत. या सर्व गोष्टींस ते कर्तव्य म्हणत. रघुनाथरावांस प्रेम शब्द आवडत नसे. कर्तव्य हा शब्द आवडत असे. मी एखाद्याला साहाय्य करतो याचा अर्थ माझे प्रेम आहे असा नाही तर मी माझे कर्तव्य केले असे ते म्हणत. रामने जर रघुनाथरावांस म्हटले, "मी त्या एका मुलासाठी तीन आठवडे

रात्रंदिवस जागरण केले; कारण त्या मुलाबद्दल आपलेपणा, प्रेम वाटत असे.'' तर ते म्हणत, ''प्रेम वगैरे काही नाही. तुमची कर्तव्यबुद्धी तुम्ही दाखवलीत; किंवा तुमची attachment आसक्ती, तिचे तुम्ही समाधान केलेत. याला प्रेम म्हणत नाही. प्रेम म्हणजे तुम्ही लगेच आजारी पडणे!'' कर्तव्य म्हणा, प्रेम म्हणा शब्दांत काय आहे? रामला रघुनाथरावांच्या ठिकाणी हा ओलावा दिसून येई. आपण आपले मन दाबू शकत नाही व रघुनाथराव दाबू शकतात. एवढाच आपल्या दोघांच्या मनोवृत्तीत फरक आहे, नाहीतर आपली उभयतांची मने सारखीच भावनाप्रधान व उदार आहेत हे रामला समजून चुकले व म्हणून रघुनाथरावांबद्दल आपलेपणा वाटू लागला. रघुनाथरावांना रामचा स्वभाव समजला, तसाच रामला रघुनाथरावांचा स्वभाव समजून चुकला. रघुनाथरावांच्या बद्दल नवीन येणाऱ्या शिक्षकांना भीती व शंका वाटे. ती राम त्यांचा स्वभाव सांगून दूर करी. रघुनाथरावांना बोल लावलेला रामला खपू नये असे अनेक वेळा रामच्या इतर मित्रमंडळींत होत असे.

जरी असे होते तरी रघुनाथरावांच्या समोर उभे राहण्यास व त्यांच्या दृष्टी भिडावयास राम धजत नसे. रघुनाथराव आजारी पडले तर त्यांच्या खोलीत जाऊन त्यांचा समाचार घेण्याचे धैर्य त्याला होत नसे. दुरून त्याने मुलांना किंवा कोणा इतरांस विचारावे, कसे आहे रघुनाथरावांचे, ताप निघाला का वगैरे. कोणीच जवळ नसले तर एखाद्या वेळेस राम जाईही तरी त्याला धैर्य होत नसे. गेल्या वर्षीच प्रथम रघुनाथरावांच्या आजारात रामने थोडी फार त्यांची शुश्रूषा केली. रघुनाथरावांची शुश्रूषा करावी, त्यांचे कपाळ चेपावे, अंग चेपून द्यावे म्हणजे रामाला मोक्षसुख वाटे. रघुनाथरावांनी जर हे काही करू दिले नाही तर त्याचे डोळे भरून येत व तो बाहेर जाऊन अश्रू पुसून टाकी. रघुनाथराव जर आजारी पडले, त्यांचा ताप वगैरे निघाला तर भक्तिमान राम रात्री आपल्या देवावर श्रद्धेने अभिषेक करी व म्हणे, ''देवा, आम्हांसारख्या काही न करणाऱ्यास आजारी का पाडीत नाहीस,

रघुनाथरावांस का पाडतोस? त्यांचे आजारीपण मला दे. त्यांना बरे कर, त्यांना झोप लागू दे.'' भोळी श्रद्धा देवाजवळ असे बोलत असते. प्रेमळ राम असेच बोले व रघुनाथराव बरे आहेत असे कळताच त्याचा चेहरा टवटवीत होई.

रामबद्दल रघुनाथराव असाच भाबडेपणा दाखवीत. राम हा कधी कधी खिन्न असावयाचा. चंद्राप्रमाणे रामच्या मनाची स्थिती असे. समुद्राप्रमाणे रामची स्थिती असे. चंद्र ज्याप्रमाणे कधी पूर्ण फुललेला, कधी अर्धाच तर कधी अजिबात नाहीसा झालेला असतो, तसेच रामचे मन कधी पूर्ण आनंदी, कधी म्लान, कधी अगदीच निराश होत असे. आपणामध्ये जगातील सर्व चांगुलपणा हवा असे रामला सदैव वाटे. आपल्या हातून चूक होऊ नये, दोष होऊ नये; आपण सर्व कलांत प्रवीण, सर्व गोष्टी जाणणारे असे व्हावे असे रामला वाटे व यामुळे तो खिन्न असे. एका मनुष्याला सर्व शक्य कसे होईल हे त्याला समजे पण उमजत नसे. अशा वेळी रघुनाथराव त्याच्याकडे येत व म्हणत, ''राम, असे करू नको; तुला एखादी गोष्ट चांगली येते, तेवढ्यानेच समाधान मान. तुझ्यामध्ये उत्कट गुण आहेत. तसे कोठे इतरांत आहेत? तुझ्यामध्ये बुद्धी नसेल, परंतु उदार हृदय तर आहे ना? त्याचीच आज आवश्यकता आहे.'' रघुनाथरावांच्या या स्तुतीने रामची मुखकळी फुलावी व त्याने जेवावयास जावे. पुष्कळ वेळा त्याने जेवूच नये. उपाशी राहावे. रघुनाथरावांस हे कोठे तरी समजे व ते लगेच रामकडे जात व म्हणत, ''आज तू जेवला नाही.'' लगेच रामने म्हणावे, ''पण आता मी खरोखर जातो आहे. मी जेवेन तुम्ही जा.'' राम थोडासा लहान मुलासारखाच होता. लहान मुलगा जसा रुसतो व कोणी तरी त्याला समजावयास लागतो, तसेच रामचे असे. रघुनाथरावांच्याकडे आले म्हणजे रामला वाटे की आपला वडील भाऊच आपणास समजावण्यास आला आहे व मग तो लगेच जेवावयास जाई. कारण रघुनाथरावांच्या मनास वाईट वाटेल असे काहीही करण्यास राम तयार नसे.

आपल्या कृत्याने रघुनाथरावांचे मन दुखेल हा विचारच त्याला सहन होत नसे.

अलीकडे राम हा रघुनाथरावांकडेच त्यांनी सांगितल्यामुळे जेवावयास जाऊ लागला. त्यांचा हेतू हा की, रामने नेहमी जेवावे व जेवताना तरी थोडे फार आनंदी राहावे. प्रथम रामला संकोच वाटे. पण पुढे रघुनाथरावांकडे तो घरातल्याप्रमाणेच वागू लागला. आपलेपणाच्या भावनेने परकेपणा नाहीसा होतो. रघुनाथराव एखाद वेळेस कोणाजवळ बोलत की, ''राम मला धाकट्या भावासारखा वाटतो; त्याला एकेरी हाक मारावी असेच वाटते.'' रामच्या कानावर हे शब्द पडले म्हणजे त्याचे चिमुकले हृदय आशेने व आनंदाने, प्रेमाने व कृतज्ञतेने भरून येई. रघुनाथराव हे किती थोर मनाचे आहेत हे रामला दिसून येई. रघुनाथरावांची भक्ती, रघुनाथरावांची कार्यनिष्ठा, परहितत्परता निःस्वार्थ बुद्धी या सर्वांमुळे रामचे हृदय रघुनाथरावांचे दास बनले. आपल्या हृदयात रघुनाथरावांची तो भक्तीने व प्रेमाने पूजा करू लागला.

रघुनाथरावांकडे जाऊन बसावे, बोलावे असे रामला वाटे. पण धैर्य होत नसे. तो पुष्कळ वेळा बोलण्याच्या हेतूने म्हणून जाई परंतु रघुनाथरावांकडे जाऊन तसाच, 'काहीतरी उगीच आलो होतो, पुस्तक पाहिजे होते.' वगैरे निमित्त करून माघारी येई. प्रेम हे बोलत नसते. लहानपणी राम आपल्या एका मित्राच्या घरी असाच जाऊन बसे व काही न बोलता परत येई. भरलेले मन बोलणार काय?

रघुनाथराव समोर असले म्हणजे रामची दृष्टी खाली असे. पण ते गेले म्हणजे तो आपली भक्तिप्रेमपूर्ण दृष्टी वर करी व त्यांच्याकडे ते दिसत नाहीसे होईपर्यंत पाहत राही. रघुनाथरावांस न कळू देता त्यांची तो पूजा करी, त्यांना वंदन करी. प्रेमाचे प्रदर्शन रामलाही आवडत नसे. आपला देव निजला म्हणजे देवाकडे तो पाही व देव जागा होताच पळून जाई. रघुनाथरावांना टेबलावर फुले वगैरे आवडत; रघुनाथरावांच्या नकळत ते कधी जेवत आहेत,

किंवा बाहेर बोलत आहेत हे पाहून हळूच पारिजातक किंवा निशिगंध, किंवा गुलाब, चमेली, जाईजुई यांची फुले रामने त्यांच्या टेबलावर नेऊन ठेवावी व कोणास काही कळवू नये. अशाप्रमाणे रामचे हृदय रघुनाथमय होत होते. पण हे कोणास माहीत होते का? स्वत: रघुनाथरावांस तरी माहीत होते का?

राम भावनेच्या भरात अनेक चुका करी, परंतु रघुनाथराव त्यास सावरून घेत. थोड्याच दिवसांपूर्वीची गोष्ट. रामने काही तरी लिहिले व त्याचा परिणाम शाळेतील मुलांत दोन तट होण्यात झाला. ज्या रघुनाथरावांनी शाळा सुधारली, तिची भरभराट केली, रात्रंदिवस तिची काळजी वाहिली, त्यांना यामुळे वाईट वाटले. तरी ते रामला एक शब्दही बोलले नाहीत. परंतु रामला आपली चूक कळून आली. बेजबाबदारपणे आपण काही तरी केले याची त्याला ओळख पटली व रघुनाथरावांची प्रांजळपणे त्याने क्षमा मागितली. इतर लोक टीका करतील त्याचे रामला वाईट वाटत नसे. जो आपणास लोभ करतो त्याच्याच टीकेला आपण महत्त्व देतो. ज्याने प्रेम करावे त्याने रागे भरावे. He who loves, can chastise आईने प्रेम करावे व आईनेच मारावे. आईच्या मारण्याने आपण सुधारू, आईला आपल्याबद्दल वाईट वाटेल हे आपल्याला समजते. तसे तिऱ्हाईताच्या मारण्याने आपण सारे सुधारत नाही. रामचे असेच असे. रघुनाथरावांच्या एका शब्दाने राम गप्प बसे; तो दुसऱ्यांच्या कठोर टीकेस इतके महत्त्व देत नसे. रघुनाथरावांनी क्षमा केली ना, त्यांनी पुंन्हा कृपापूर्ण दृष्टीने व भरल्या डोळ्यांनी पाहिले ना; त्यांना माझे पश्चात्तापदग्ध मन समजले ना, चांगले झाले. इतरांची मला काय पर्वा? ज्यांना माझ्याबद्दल लवही आपलेपणा नाही, त्यांच्या टीकेसही मी किंमत देत नाही असे राम म्हणे.

रघुनाथरावांनी रामला त्यावेळेस मोकळे मनाने क्षमा केली. रामने दोन दिवस उपोषण करून प्रायश्चित्त घेतले. आपण रघुनाथरावांच्या मनास क्लेश देण्यास कारणीभूत झालो, हा एकच विचार त्याच्या मनास किती तरी दिवस त्रास देत होता. परंतु

रामच्या हातून ही चूक झाली नाही, तो थोड्याच दिवसांनी रामने आणखी एक मोठा गुन्हा केला. राम हा उत्कट भावनाधीन प्राणी आहे. त्याला तारतम्य, पुढचे मागचे हे आठवत नसते. भावनेच्या भरात वाटेल ते बोलतो व लिहितो. त्याचे परिणाम इतरांना भोगावे लागतील की काय याची तो फिकीरच करीत नाही. आपण एका संस्थेत आहोत हे तो विसरतो व मुलांना बेभान करणारे वाटेल ते बोलतो, लिहितो. मुलांच्या कोमल मनावर साहजिकच त्याचा परिणाम होतो व ते काही गोष्टी करू लागतात. चालकास संकटप्राप्त होण्याची वेळ येते. रामला हे अद्याप समजत नाही. आपण विस्तवाशी खेळत आहोत, हे त्याला समजत नाही. संस्थेची प्रत्यक्ष जबाबदारी त्याच्यावर नसल्यामुळे तो असे करीत असेल. जवाहर नेहरू राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी शिरावर येताच जसे Sober minded जरा धिमे व विचारी बनले, तसेच रामवर संस्थेची प्रत्यक्ष जबाबदारी पडेल तरच त्याच्या भावनांना लगाम बसेल. परंतु असे बंधन घालणे म्हणजे रामचे व्यक्तिवैशिष्ट्यच मारणे आहे. कोकिळेस तिचा गळा दाबून ठेवून गावयास सांगण्यासारखे आहे. कलेला स्वेच्छेचे बंधन असते. परेच्छेचे बंधन तिला खपत नाही. गायकाला दुसऱ्याची बंधने सोसत नाहीत. फुलाला बंधनात घालू म्हणतात तर ते कोमजेल. रामवर जबाबदारीचे ओझे टाकून मग त्याला लिहाबोलण्यास सांगणे हे कोकिळेचा गळा दाबून तिला गाण्यास सांगण्याप्रमाणे आहे. याऐवजी कोकिळेला अजिबात गाऊच नको असे सांगावे. कोकिळे, अजून तुझे मोकळे गाणे ऐकण्याची पात्रता लोकांना नाही; लोक तितके धीट, थोर व रसिक नाहीत. योग्य वेळ, वसंत ऋतु येऊ दे, खरोखर येऊ दे व मग मुक्त कंठाने तू गा असेच तिला सांगणे आहे.

रामला असेच सांगितले पाहिजे, 'राम, भावनोन्मत्त होतोस. तुला सारासार विचार राहत नाही. तू काही काळ असली गाणी गाऊ नको. असले लेख लिहू नकोस. असे बोलू नकोस.' असे त्याला रघुनाथरावांनी लोभाने सांगितले तर पटणार का नाही?

रघुनाथरावांचा वात्सल्यपूर्ण शब्द म्हणजे रामला वेदवाक्य. रघुनाथराव आपले मन उगीच दुखावणार नाहीत ही रामला खात्री असे. म्हणूनच त्यांच्या शब्दाला तो मान देतो. आपल्या लिहिण्याने पुन्हा आज रघुनाथरावांवर इतक्या लवकर चिंताजनक परिणाम व्हावा याचे रामला वाईट वाटले. दोन महिन्यांपूर्वीच रघुनाथरावांचे मन दुखावणारे ते लेखन मी लिहिले, पुन्हा तेच माझ्या हातून घडले! मी तरी काय करणार? हे देवा! माझी ही प्रार्थना ऐक. रामने मनापासून प्रार्थना केली. एकच विचार त्याच्या मनात होता. रघुनाथराव मला मनात काय म्हणतील? ते मला नेहमीच्या उदार मनाने क्षमा करतील? का इतर कठोर प्रकृतीच्या माणसांप्रमाणे ते माझ्यावर संतापतील? ते माझा अपराध पोटात घालतील का रागे भरतील? माझ्या हेतुबद्दल तरी ते साशंक नसतील ना? मी दुष्ट आहे, असे तर त्यांना वाटणार नाही ना? छे! असे होणार नाही. त्यांनी आपला धाकटा भाऊ मला मानले आहे. मी जर अपराध कबूल करतो. पुनश्च दूरवर विचार केल्याखेरीज काही करणार नाही, असे सांगतो. तर ते मग रागावतील कसे? ते रागावणार नाही व म्हणतील, 'राम, पुन्हा नको हो असे करू. परिस्थिती पाहून वाग. उगीच काही तरी करू नको.' जर माझ्यावर रघुनाथराव संतापणार नसतील तर आणखी काय मला हवे आहे? असे राम मनात म्हणत असे. त्या रात्री रामला झोप आली नाही. शून्य मनाने आकाशाकडे बघे व ताऱ्यांप्रमाणे तेजस्वी अश्रू त्याच्या डोळ्यांत चमकत. मध्येच तो खोलीत जाई, आपले मन कागदावर लेखनाद्वारे ओकून हलके करण्याचा तो प्रयत्न करी. पहाटेपर्यंत असेच चालले होते. पहाटे राम आपल्या घोंगडीवर पडला व त्याला एक स्वप्न पडले, किती गोड स्वप्न! रघुनाथरावांनी रामला हाक मारली व "राम, इतके वाईट नको वाटून घेऊ, अरे तुझी तरी काय चूक? ही परिस्थितीमुळे चूक झाली. आग लावणाऱ्यांमुळे झाली. चल. रडू नकोस. पुन्हा सावधगिरीने वाग." रघुनाथरावांचे आश्वासनपर शब्द ऐकून राम आनंदला

व तो हसणार इतक्यात प्रार्थनेची वेळ झाली व राम जागा झाला.

'परिस्थितीचे भानच राहत नाही. सर्वत्र निर्भयता आहे. परंतु प्रत्यक्ष वस्तुस्थिती मागून दिसली, आपली चूक व विचारशून्यता ही दिसली, म्हणजे मी खिन्न होतो! परंतु बैल गेला नि झोपा केला तसेच नाही का हे? आपला खेळ होतो पण रघुनाथरावांचा जातो जीव! आपण करतो व त्यांना निस्तरावे लागते! आपण घाण करतो व त्यांना सारवासारव करावी लागते. देवा, मला आधी सद्बुद्धी तू का देत नाहीस? पुढे होणारे परिणाम आधीच माझ्या मनासमोर का आणीत नाहीस?' इत्यादी शेकडो विचार रामच्या अंत:करणात जमा होऊ लागले. व त्याच्या डोळ्यांतून झरझर पाणी येऊ लागले. माझ्यामुळे दुसऱ्यास त्रास, रघुनाथरावांस त्रास. देवा, का बरे माझ्याच हातून पुन्हा इतक्या लवकर असे व्हावे, राम स्वत:शी म्हणू लागला.

'माझ्यामुळे देवा संस्थेचे किंवा कोणाचे वाईट नको हो होऊ देऊ. रघुनाथरावांच्या शाळेत जर कोणी आजारी पडला तर, देवा रघुनाथरावांच्या शाळेत कोणाला आजारी पाडू नको, या शाळेचे मंगल कर. आजारी बरा कर. असे मी सतत तुला सांगत असे, प्रार्थीत असे. असे या शाळेबद्दल, रघुनाथरावांबद्दल मी कितीदा तुला विनविले आहे. माझी पापे असंख्य असली तरी ती माझ्या मार्गात आड येवोत, त्यामुळे काही नुकसान होवो. परंतु रघुनाथराव व त्यांची संस्था यांचे अडता कामा नये, माझ्यामध्ये काही अल्प सत्‌अंश असेल तर तोच लक्षात राहो.'

पू. साने गुरुजी जन्मशताब्दी निमित्त
चेतश्री - प्रकाशने

* छात्रालय / साने गुरुजी / रु. २०
* चंद्रोदय / साने गुरुजी / रु. २५
* देवाघरच्या फुलांनो / साने गुरुजी / रु. ३०
* उमाळा / साने गुरुजी / रु. ३५
* अमृताहुनी गोड / डॉ. ग. ना. जोशी
* पू. साने गुरुजींचे तत्त्वचिंतन / डॉ. ग. ना. जोशी
* साने गुरुजींचे दुर्मिळ छायाचित्र

★ *आगामी* ★

* पू. साने गुरुजींचे साहित्य-चिंतन / संपा. वा. रा. सोनार
* तत्त्वज्ञानाची कहाणी / अनु. साने गुरुजी
  संपा. डॉ. ग. ना. जोशी
  (उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सहकार्याने)
* साने गुरुजींचा पोवाडा / शिसोदे गुरुजी

: संपर्क :

चेतश्री प्रकाशन

मुक्ताई, धुळे रोड, अमळनेर ४२५४०१.